


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३१२ ■ शुक्रवार, दि.२२ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# वीजगळती महावितरणची, खिसा रिकामा ग्राहकांचा

प्रतिनिधी २२ मे



**मुंबई :** राज्यभरात वीजचोरी आणि तांत्रिक कारणांमुळे मोठ्या प्रमाणात वीजगळती होत असते. अशातच आता महावितरणच्या ८०० कोटींच्या वीजगळतीचा फटका थेट ग्राहकांना बसत असल्याचे चित्र आहे. दरवर्षी १,५०० ते १,७०० कोटींहून अधिकचे युनिट वीज वितरण होत असतं. त्यापैकी १५ टक्क्यांहून अधिक म्हणजेच सुमारे २५० कोटी युनिट वीजगळती होत असते. या वीजगळतीची किंमत तब्बल ७०० ते ८०० कोटी रुपयांपर्यंत असून त्याचा भुर्दंड वीजदरवाढीच्या माध्यमातून सर्वसामान्य ग्राहकांवर बसणार आहे.महावितरणच्या म्हणण्यानुसार, एमईआरसीकडून १५ टक्क्यांहून कमी वीजगळती असावी असे निर्देश आहेत. त्या दृष्टीनेच आमचे प्रयत्न असून वीजगळती कमी करण्याचा प्रयत्न असतो. असं असलं तरी या सर्वाचा फटका आता सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार असून ग्राहकांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

धाराशिवच्या कळंब तालुक्यातील मोहा परिसरात शेतकऱ्यांना वीज मिळत नसल्याने मोठ्या समस्येला समोर जावं लागत आहे. विजेच्या अभावी शेतातली उभी पिक करपण्याची वेळ आली आहे. विहिरीत थोडं असलेलं पाणी पिकांना द्यावं आणि पीक जगवावी, कसं वाटत असलं तरी ते शक्य नसल्याने शेतकऱ्याला मोठा प्रश्न पडला आहे. राजकीय पुढाऱ्यांचं वीज प्रश्नाकडे लक्ष नाही, प्रशासनाचा मनमानी कारभार सुरु आहे. त्यामुळे वाढत्या उन्हात विज टंचाईमुळे शेती पिकांना फटका बसत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

### गळतीची प्रमुख कारणे

- ग्रामीण भागात बेकायदा विजेचा गैरवापर
- जुनी झालेली वीज वितरण यंत्रणा
- नोंदणीच्या तुलनेत वाढीव हॉर्स पॉवरच्या कृषिपंपाची जोडणी
- राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पसरलेले वितरण जाळे

### पुढील पाच वर्षांसाठी मंजूर वीजगळती

| | |
|---|---|
| २०२५-२६ | - १७ टक्के |
| २०२६-२७ | - १५.५ टक्के |
| २०२७-२८ | - १४ टक्के |
| २०२८-२९ | - १२.५ टक्के |
| २०२९-३० | - ११ टक्के |

## तब्बल ७०० ते ८०० कोटींचा फटका

## अधिकारी सोडून भुर्दंड मात्र ग्राहकाकडून वसूलणार ?

# दगडाने ठेचून हत्या

प्रतिनिधी २२ मे

**अकोला :** अकोल्यातील बोरगाव मंजू पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या यावलखेड परिसरातील रेल्वे ट्रॅकजवळ आज एका युवकाचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली. मृतदेहाची अवस्था अत्यंत भीषण असून, अज्ञात मारेकऱ्यांनी दगडाने ठेचून या युवकाची अत्यंत निर्घृणपणे हत्या केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

मृत युवकाचे वय अंदाजे २२ ते २५ वर्षांच्या दरम्यान असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. या घटनेची माहिती मिळताच बोरगाव मंजू पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला असून तो उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे. हा युवक कोण आहे? तो कुठला रहिवासी आहे? आणि त्याची हत्या कोणी व कोणत्या कारणासाठी केली? याचा शोध आता बोरगाव मंजू पोलीस घेत आहेत. या थरारक हत्याकांडामुळे परिसरात मात्र कमालीची भीती आणि संशयाचे वातावरण पसरले आहे.'

# आंतरवाली सराटीत लाड – जरांगेंत चर्चा

प्रतिनिधी २२ मे



**जालना :** मराठा आंदोलनाचा केंद्रबिंदू असणाऱ्या आंतरवाली सराटीत सध्या मराठा आंदोलक मनोज जरांगे व भाजप आमदार प्रसाद लाड यांच्यात चर्चा सुरू आहे. त्यात लाड यांनी जरांगे यांना त्यांचे ३० मेपासून सुरू होणारे संभाव्य आंदोलन मागे घेण्याचे आंदोलन केले. त्यावर जरांगे यांनी सध्या तरी कोणतीही भूमिका स्पष्ट केली नाही. पण सरकारने मराठा समाजाला अद्याप सरसकट कुणबी प्रमाणपत्र का दिले नाही? असा सवाल करत लाड यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, प्रसाद लाड यांच्या आवाहनावर जरांगे कोणती भूमिका घेतात? याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे.

मनोज जरांगे यांनी येत्या ३० तारखेपासून आंतरवाली सराटीत उपोषण सुरू करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून पुन्हा एकदा राज्यात मराठा आरक्षणाचे रान पेटले आहे. जरांगेंनी दोन दिवसांपूर्वी नुकतीच प्रसाद लाड यांना भेटीचे निमंत्रण दिले होते. त्यानुसार लाड यांनी आज त्यांची आंतरवाली सराटीत जाऊन भेट घेतली. यावेळी उभय नेत्यांत प्रदिर्घ काळ चर्चा झाली. त्यात लाड यांना जरांगे यांना सध्याचा उन्हाचा कडाका व शेतीच्या मशागतीची कामे पाहता त्यांचे आगामी उपोषण लांबणीवर टाकण्याचे आवाहन केले.

प्रसाद लाड म्हणाले, सध्या कडाक्याचे उन पडले आहे. तसेच खरीप हंगामाचीही कामेही सुरू आहेत. त्यामुळे माझे मनोज जरांगे यांना त्यांचे ३० मेपासून सुरू होणारे उपोषण लांबणीवर टाकण्याचे आवाहन आहे. सरकार आपल्या जागी आहे. मी मराठा समाजातर्फे त्यांना हे आवाहन करत आहे. मी गीतेतला सार घेऊन येथे आलो आहे. मुख्यमंत्री जातीचे नसतानाही त्यांनी मराठा समाजाला आरक्षण दिले. हा जरांगे यांचाच विजय आहे. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारे कार्यकर्ते आहोत, असे ते म्हणाले.प्रसाद लाड म्हणाले, माझे व मनोज जरांगे यांच्यात अनेकदा वाद झाले हे मला मान्य आहे. मराठा समाजाचा लढा १९८१ पासून सुरू झाला. जरांगे यांनी लढा दिला. त्यामुळे माझ्या समाजाला आरक्षण मिळाले. त्याविषयी मी जरांगे यांचे आभार मानतो. मी त्यांना विनंती केली की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना समजून घ्या. मागील ७० वर्षांत कोणत्याही मराठा नेत्याने केले नाही, असे काम फडणवीस यांनी केले आहे. जरांगेंनी ३० मेपासून आंदोलन करू नये. सध्या उन्हाचे दिवस आहेत. मी आमदार व नेता म्हणून येथे आलो नाही. सामान्य समाजाचा माणूस म्हणून मी येथे आलो आहे.

# महावितरणमधील खळबळजनक कारभाराची चौकशी कधी ?

प्रतिनिधी २२ मे

**तक्रार होऊनही सायबर पोलिसांची संशयास्पद शांतता !**
**ना गुन्हा दाखल, ना तपास पूर्ण; न्याय मागण्यासाठी तक्रारदाराने जायचे कोणाकडे ?**

**अकोला :** एकीकडे महावितरणच्या अकोला शहर विभागातील कंत्राट वाटपात मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार आणि भेदभाव होत असल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधींकडून होत असतानाच, दुसरीकडे एका कंत्राटदाराला जाणूनबुजून बाद करण्यासाठी शासकीय ई-मेल आयडीचा गैरवापर केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मात्र, या गंभीर प्रकरणाची लेखी तक्रार देऊनही अकोला पोलीस आणि सायबर विभागाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. 'ना गुन्हा दाखल, ना तपास पूर्ण' अशा संशयास्पद भूमिकेमुळे आता सायबर पोलिसांच्या कार्यपद्धतीवरच मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, वरिष्ठ स्तरावरून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

अकोल्यातील 'अर्णव इलेक्ट्रिकल्स' या फर्मला नाशिकमधील एका मोठ्या टेंडर प्रक्रियेतून बाहेर काढण्यासाठी महावितरणच्या अकोला शहर विभागाच्या अधिकृत ई-मेल आयडीवरून चुकीची आणि खोटी माहिती पाठवण्यात आली होती. २ एप्रिल २०२६ रोजी पाठवण्यात आलेल्या या खोट्या ई-मेलमुळे कंत्राटदार गणेश सारसे यांना आर्थिक फटका बसला. विशेष म्हणजे, हा ई-मेल पाठवल्यानंतर तो रेकॉर्डमधून डिलीट करून पुरावे नष्ट करण्याचाही प्रयत्न झाल्याचा संशय आहे. मुख्य अभियंत्यांच्या हस्तक्षेपानंतर ४ मे २०२६ रोजी महावितरणने 'सदर ई-मेल आम्ही केला नाही' असा खुलासा केला. या संपूर्ण कटात महावितरणच्याच काही वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा हात असण्याची शक्यता असून, कंत्राटदाराने अकोला पोलीस अधीक्षकांकडे याबाबत रीतसर तक्रार नोंदवली आहे. मात्र, अनेक दिवस उलटूनही सायबर पोलिसांकडून तपास संथ गतीने सुरू असल्याने त्याच बरोबर या प्रकरणात गुन्हा दाखल नसल्याने पोलिसांच्या भूमिकेवर संशय बळावला आहे.

# नीट पेपर 5 राज्यांमध्ये विकला गेला

प्रतिनिधी २२ मे

**पाटणा :** सीबीआय चौकशीत उघड झाले आहे की, नीटचा पेपर ५ राज्यांमध्ये विकला गेला होता. सर्वाधिक विक्री महाराष्ट्रात झाली आणि दुसऱ्या क्रमांकावर राजस्थान आहे. एजन्सीच्या अधिकाऱ्याने सांगितले की, आतापर्यंत अटक केलेल्या आरोपींच्या चौकशीतून आणि डिजिटल गॅजेट्स तपासल्यानंतर ही माहिती समोर आली आहे.सीबीआयचे म्हणणे आहे की, पुढील आरोपींच्या अटकेनंतर पेपरफुटीचे प्रकरण आणखी मोठे असू शकते. याच कारणामुळे एजन्सीला अजून हे निश्चित करता येत नाहीये की, किती विद्यार्थ्यांनी पेपर विकत घेतला होता. चौकशीत समोर आले आहे की, काही पालकांनी पेपर पुढे इतर लोकांना विकला होता. सीबीआयला महाराष्ट्र आणि राजस्थानमध्ये पेपरच्या प्रती काढून विकल्याचे पुरावे मिळाले आहेत. याच कारणामुळे अजून हे शोधणे कठीण आहे की, पेपर किती लोकांपर्यंत पोहोचला. आतापर्यंतच्या चौकशीत समोर आले आहे की, पेपरफुटीचे सर्वात मोठे केंद्र महाराष्ट्र होते. इथूनच राजस्थान आणि इतर राज्यांमधील विद्यार्थ्यांपर्यंत 'प्रश्न बँक' पोहोचली.




# १३ महिलांवर वाघिणीचा हल्ला

## ४ महिला ठार

प्रतिनिधी २२ मे

**चंद्रपूर :** जंगलात तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या महिलांवर वाघिणीने केलेल्या हल्ल्यात तब्बल ४ महिलांचा मृत्यू झाल्याची भयंकर घटना चंद्रपूरच्या सिंदेवाही तालुक्यात घडली आहे. या घटनेत इतर काही महिला जखमी झाल्याची माहिती आहे. गतवर्षी १० मे रोजी सिंदेवाही तालुक्यातील मेंढा (माल) जंगलात वाघाने ३ महिलांचा बळी गेला होता. त्यानंतरही ही दुसरी मोठी घटना आहे. दरम्यान, कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या महिलांचा बळी हा प्रशासकीय अनास्थेने केलेला घात असल्याचा आरोप केला आहे. सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही जंगलात शुक्रवारी सकाळी ९ च्या सुमारास ही घटना घडली. गुंजेवाही येथील १३ महिलांचा एक समूह शुक्रवारी सकाळी तेंदूपत्ता वेचण्यासाठी जंगलात गेल्या होत्या. तेंदूपत्ता वेचण्याचे काम सुरू असताना या महिलांवर वाघिणीने अचानक हल्ला चढवला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे या महिला घाबरल्या व जिवाच्या आकांताने सैरावैरा पळत सुटल्या. पण वाघाने ४ महिलांवर झडप घातली. त्यात त्यांचा बळी गेला. इतर महिलांपैकी १ महिला ओरडतच गावात आली. तिने आरडाओरडा करत गावकऱ्यांना घडलेल्या घटनेची माहिती दिली.



# शेती कर्ज वाटपाचा विषय बँकांनी गांभीर्याने हाताळावा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** राज्यातील शेतकरी, एमएसएमई आणि अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी बँकांनी केवळ नफ्याचा विचार न करता सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून काम करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने राष्ट्रीयकृत बँकांनी व्यापक दृष्टिकोन ठेऊन शेती कर्ज व पिक कर्ज वाटप गांभिर्याने घेण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बँकर्स समितीची १७१ वी बैठक झाली त्यावेळी बँकांना निर्देशित केले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, राज्यस्तरीय बँकर्स समिति सदस्य उपस्थित होते. एसएलबीसीच्या माध्यमातून वार्षिक कर्ज आराखडा २०२६-२७ चे विमोचन करताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील कर्जवाटप, पीक कर्ज, एमएसएमई क्षेत्र आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणींवर सविस्तर भाष्य केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यंदाच्या वार्षिक कर्ज आराखड्यात कृषी हंगाम, केंद्र शासनाच्या विविध योजना, एमएसएमई क्षेत्र आणि ग्रामीण विकासाशी संबंधित विविध मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे.

## बँकांनी सामाजिक जबाबदारी पार पाडण्याचे निर्देश

मात्र, राज्यातील बहुतांश क्षेत्रांमध्ये कर्जवाढ होत असली तरी कर्ज खात्यांची संख्या सातत्याने कमी होत असल्याची बाब अत्यंत चिंताजनक आहे. मुख्यमंत्री म्हणाले, क्रेडिट वाढत आहे; मात्र खाते वाढत नाहीत, उलट कमी होत आहेत. ही परिस्थिती धोकादायक असून एसएलबीसीने यावर विशेष फोकस करुन स्ट्रॅटेजी तयार करण्याची गरज आहे. २०२२-२३ मध्ये राज्यात ६१.१५ लाख खाती होती. ही संख्या २०२३-२४ मध्ये ५६ लाखांवर आली, २०२४-२५ मध्ये ५४ लाखांवर पोहोचली आणि २०२५-२६ मध्ये ती केवळ ४३ लाखांवर आली आहे. '६१ लाखांवरून ४३ लाखांपर्यंतची घसरण ही अत्यंत गंभीर बाब आहे. नेमके काय चुकत आहे, याचा गांभिर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

पीक कर्ज वितरणात सहकारी बँकांची कामगिरी राष्ट्रीयीकृत बँकांच्या तुलनेत अधिक प्रभावी असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राष्ट्रीयीकृत बँकांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका राज्यातील ६१ टक्के खाते कव्हर करतात आणि त्यांची कामगिरी ८५ टक्के आहे. याउलट राष्ट्रीयीकृत बँका २६ टक्के खाते कव्हर करूनही त्यांची कामगिरी केवळ ६७ टक्के आहे. याचा अर्थ असा आहे की राष्ट्रीयीकृत बँका पीक कर्ज आणि टर्म लोनच्या बाबतीत अपेक्षित गांभीर्य दाखवत नाहीत. हा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. यावर्षी त्यांनी किमान ८० ते ८५ टक्के उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

### एसएलबीसी केवळ औपचारिकता राहू नये

एसएलबीसी ही केवळ वार्षिक बैठक किंवा छापील अहवालापुरती मर्यादित राहू नये, असे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'एसएलबीसीचा आत्मा आणि उद्देश प्रत्यक्ष कामात उतरला तरच राज्याच्या आर्थिक विकासाला त्याचा खरा फायदा होईल. बैठकीत चांगली कामगिरी करणाऱ्या तसेच कमी कामगिरी करणाऱ्या बँकांची नावे जाहीर करण्याची गरज मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

'बँका केवळ नफ्यासाठी नाहीत. त्या देशाच्या आर्थिक धोरणाचा महत्त्वाचा भाग आहेत. त्यामुळे सामाजिक जबाबदारी लक्षात घेऊन त्यांनी अधिक सक्रियपणे काम केले पाहिजे. राज्यातील शेतकरी, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत कर्जाचा लाभ प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी सर्व बँकांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन करून मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.



### महिला शेतकरी, ग्रामीण उद्योजकता आणि आर्थिक समावेशनासाठी बँकांनी अधिक सक्रिय व्हावे : सुनेत्रा पवार

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशातील सर्वात सक्षम अर्थव्यवस्थांपैकी एक असून राज्याचा आर्थिक विकास अधिक वेगाने पुढे नेण्यासाठी बँकिंग क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. आर्थिक समावेशन, महिला सक्षमीकरण, ग्रामीण उद्योजकता आणि महिला शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र वित्तीय धोरणाची गरज यावर त्यांनी विशेष भर दिला.

राज्याचा सीडी रेशो ९८.०२ टक्के असल्याचे सांगताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, गडचिरोलीसारख्या जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण अधिक वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. ग्रामीण उद्योजकता आणि स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी बँकांनी अधिक सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच जनधन योजना, अटल पेन्शन योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना आणि सुरक्षा विमा योजना यामुळे आर्थिक समावेशनाला मोठी गती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. आधार सिडिंग, रुपे कार्ड वितरण आणि खात्यांचे सक्रियकरण यावर अधिक भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. त्याच प्रमाणे महिला सक्षमीकरणासाठी विशेष वित्तीय धोरणाची गरज अधोरेखित करुन सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, महिला बचत गट, महिला उद्योजक आणि ग्रामीण महिलांना सुलभ कर्ज उपलब्ध करून देत महिलांचे आर्थिक सक्षमीकरण अधिक मजबूत करण्याची आवश्यकता आहे.

संयुक्त राष्ट्र संघाने २०२६ हे वर्ष 'इंटरनॅशनल इयर ऑफ वुमन फार्मर' म्हणून घोषित केले असल्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, राज्यातही महिला कृषी वर्ष घोषित करण्यात आले आहे. 'अन्नसुरक्षा, दुग्धव्यवसाय, पशुपालन, भाजीपाला उत्पादन, शेती प्रक्रिया उद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला महिला मोठा आधार देतात. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर महिला प्रत्यक्ष शेतीच्या कामात सहभागी होतात; मात्र त्यांना स्वतंत्र कर्ज, जमीन मालकी, किसान क्रेडिट कार्ड, यांत्रिकीकरण, तंत्रज्ञान आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यात अनेक अडचणी येतात,' असे त्यांनी स्पष्ट केले.

### महिला शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र पीक कर्ज योजनेची मागणी

एसएलबीसी स्तरावर महिलांसाठी विशेष कृषी वित्त धोरण राबविण्याची सुनेत्रा अजित पवार यांनी आवश्यकता व्यक्त करत त्यांनी महिला शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र पीक कर्ज योजना तयार करण्याची सूचना केली. महिला बचत गट, एसएचजी, एफपीओ आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना सुलभ कर्ज उपलब्ध करून देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. महिला शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कृषी यांत्रिकीकरणासाठी कर्ज उपलब्ध करून द्यावे, तसेच जमीन मालकी नसतानाही प्रत्यक्ष शेती करणाऱ्या महिलांसाठी पर्यायी निकषांचा विचार करावा, असेही त्यांनी सांगितले. तळागाळातील महिलांपर्यंत वित्तीय सेवा पोहोचवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात महिला कृषी कर्ज मेळावे आयोजित करण्याची सूचनाही त्यांनी केली. यामुळे ग्रामीण महिलांना बँकिंग आणि कर्ज योजनांचा थेट लाभ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हवामान बदलामुळे अनियमित पाऊस, उष्णतेच्या लाटा आणि गारपीट यांसारख्या संकटांमुळे कृषी जोखीम वाढल्याचे सांगत त्यांनी अल्प मुदतीच्या कर्जासोबतच दीर्घ मुदतीच्या पुनर्गठन पर्यायांची उपलब्धता वाढवण्याची गरज व्यक्त केली. 'विकसित महाराष्ट्र आणि विकसित भारत या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी शासन, बँका आणि सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करणे अत्यंत आवश्यक असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले.

### सिबिल स्कोअर वरून अडवणूक करू नका

पीक कर्जासाठी शेतकऱ्यांना सिबिल स्कोअरच्या कारणावरून अडवले जात असल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. कर्ज हंगाम सुरू झाला की प्रत्येक जिल्ह्यातून सिबिल स्कोअरच्या तक्रारी येतात. आरबीआयने स्पष्ट केले आहे की पीक कर्जासाठी सिबिल स्कोअरची अट आवश्यक नाही. मात्र शाखा मुख्यालयाच्या सूचनांचे कारण देतात. त्यामुळे सर्व बँकांच्या मुख्यालयांनी स्पष्ट निर्देश द्यावेत की पीक कर्जासाठी सिबिल स्कोअरची अट लागू करू नये,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

### जिल्हानिहाय कामगिरीवर चिंता

पीक कर्ज वितरणात केवळ सिंधुदुर्ग आणि धुळे या दोन जिल्ह्यांनी ९० ते १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केल्याचे मुख्यमंत्री यांनी नमूद केले.

रायगड, पुणे, सातारा, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, लातूर, अमरावती, चंद्रपूर आणि भंडारा हे जिल्हे ७३ ते ९० टक्क्यांच्या गटात असल्याचे त्यांनी सांगत पालघर, रत्नागिरी, सांगली, नंदुरबार आणि नांदेड या जिल्ह्यांतील कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी असल्याने या भागांमध्ये विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### एमएसएमई क्षेत्राबाबतही चिंता

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एमएसएमई क्षेत्रात कर्जवाढ होत असली तरी नवीन खाते वाढत नाहीत. प्रधानमंत्री मुद्रा योजनेतील 'तरुण' श्रेणीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, १५ लाख रुपयांपर्यंतच्या या श्रेणीत राज्यभरात आतापर्यंत केवळ साडेसात हजार लाभार्थी झाले आहेत. हीच श्रेणी अर्थव्यवस्थेला मोठे योगदान देऊ शकते. त्यामुळे सर्व बँकांनी यासाठी स्वतंत्र उद्दिष्ट निश्चित करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.

# समाजसुधारणेचा दीपस्तंभ : राजा राममोहन रॉय

राजा राममोहन रॉय हे भारतीय पुनर्जागरणाचे अग्रदूत मानले जातात. आधुनिक भारताच्या सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक सुधारणांचा पाया घालणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाची जयंती म्हणजे समाजप्रबोधनाच्या कार्याची आठवण करून देणारा प्रेरणादायी दिवस होय.एकोणिसाव्या शतकात त्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये समाज सुधारणांसाठी केलेले प्रयत्न,त्यासाठी उभारलेला सनदशीर लढा आणि कायद्याची मदत घेऊन केलेल्या समाजसुधारणा आजही प्रेरणादायी आहेत. त्यांनी अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकाच्या संक्रमणकाळात भारतीय समाजाला नव्या विचारांची दिशा दिली. त्यांच्या विचारांमुळे भारतीय समाजात आधुनिकतेची पहाट उगवली. राजा राममोहन रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ रोजी बंगालमधील राधानगर येथे झाला. त्यांचे वडील रामकांत रॉय आणि आई तारिणी देवी हे धार्मिक वृत्तीचे होते.

बालपणापासूनच त्यांना संस्कृत, फारसी, अरबी, बंगाली आणि इंग्रजी भाषांचे ज्ञान प्राप्त झाले. विविध धर्मग्रंथांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. वेद, उपनिषदे, कुराण आणि बायबल यांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांनी मानवतेचा व्यापक दृष्टिकोन स्वीकारला.त्यांचा उत्कर्ष हा भारतातील सामाजिक आणि वैचारिक संक्रमणाच्या काळात झाला. त्या काळात भारतात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता होती. इंग्रजांचे राजकीय वर्चस्व वाढत असताना भारतीय समाज मात्र अनेक अनिष्ट प्रथा, अंधश्रद्धा आणि कालबाह्य चालीरीतींमध्ये अडकलेला होता. स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. सतीप्रथा, बालविवाह, बहुपत्नीत्व, स्त्रीशिक्षणावरील बंदी, विधवांचा होणारा छळ, जातिभेद आणि अस्पृश्यता या सामाजिक विकृतींनी समाज पोखरला होता. धर्माच्या नावाखाली कर्मकांडांना अधिक महत्त्व आले होते. समाजात विवेकापेक्षा अंधश्रद्धेचे वर्चस्व वाढले होते.

अशा प्रतिकूल परिस्थितीत राजा राममोहन रॉय यांनी समाजसुधारणेचा ध्यास घेतला. त्यांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे आवाज उठवला. विशेषतः सतीप्रथेच्या विरोधातील त्यांचा लढा ऐतिहासिक मानला जातो. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीला जिवंत जाळण्याची अमानवी प्रथा त्यांनी मानवतेविरुद्धचा अपराध असल्याचे ठामपणे मांडले. त्यांनी अनेक लेख, पुस्तके आणि निवेदने लिहून समाजमत जागृत केले. इंग्रजी सत्ताधाऱ्यांशी पत्रव्यवहार करून त्यांनी सतीप्रथा बंद करण्याची मागणी सातत्याने केली. त्या काळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेन्टींक यांच्याशी त्यांनी संवाद साधला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन १८२९ मध्ये



सतीप्रथेवर बंदी घालणारा कायदा लागू करण्यात आला. हा भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला.

राजा राममोहन रॉय यांनी १८२८ मध्ये 'ब्राह्मो समाज' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून एकेश्वरवाद, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता आणि विवेकनिष्ठ विचार यांचा प्रचार करण्यात आला. त्यांनी मूर्तिपूजा, अंधश्रद्धा आणि अवास्तव कर्मकांडांना विरोध केला. धर्म म्हणजे मानवसेवा आणि नैतिकता हा संदेश त्यांनी दिला. शिक्षण क्षेत्रातही त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांनी आधुनिक शिक्षणाचा पुरस्कार केला. इंग्रजी शिक्षण, विज्ञान आणि गणित या विषयांच्या अभ्यासाला त्यांनी प्रोत्साहन दिले. भारतीय युवकांनी आधुनिक ज्ञान मिळवावे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी हिंदू कॉलेज स्थापनेतही पुढाकार घेतला. बंगाली भाषेत अनेक ग्रंथ प्रकाशित करून त्यांनी समाजप्रबोधन केले.

'संवाद कौमुदी आणि 'मिरात-उल-अखबार'यांसारख्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर जनजागृती केली. भारतीय पत्रकारितेचे जनक म्हणूनही त्यांचा गौरव केला जातो.समाजसुधारणेच्या कार्यात त्यांना मोठा विरोध सहन करावा लागला. सनातनी मंडळींनी त्यांच्यावर टीका केली. धर्मविरोधी, परंपराविरोधी अशी त्यांची बदनामी करण्यात आली. काहींनी त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्याचाही प्रयत्न केला. मात्र त्यांनी विवेक, तर्क आणि मानवतेच्या आधारावर आपले कार्य अखंड सुरू ठेवले. समाजहितासाठी संघर्ष करण्याची त्यांची वृत्ती अत्यंत प्रेरणादायी होती.

राजा राममोहन रॉय यांनी इंग्लंडमधील सत्ताधाऱ्यांशी आणि विचारवंतांशीही पत्रव्यवहार केला. भारतीय समाजातील परिस्थिती, शिक्षणाची गरज आणि सुधारणांचे महत्त्व त्यांनी ब्रिटिश प्रशासनाला पटवून दिले. भारतात आधुनिक शिक्षणपद्धती सुरू व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचाही पुरस्कार केला. प्रेसवरील निर्बंधांविरोधात त्यांनी आवाज उठवला. सन १८३० मध्ये ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी भारतीयांच्या प्रश्नांबाबत भूमिका मांडली. इंग्लंडमधील अनेक विद्वानांनी त्यांच्या विचारांचे स्वागत केले. २७ सप्टेंबर १८३३ रोजी ब्रिस्टलजवळील स्टेपलटन येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने भारताने एक महान समाजसुधारक गमावला; मात्र त्यांनी पेटवलेला समाजप्रबोधनाचा दीप आजही तेवता आहे.राजा राममोहन रॉय यांच्या विचारांचा प्रभाव भारतातील अनेक समाजसुधारकांवर पडला. महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या अनेक समाजसुधारकांनी सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक व्यापक केली. महाराष्ट्र अशा सामाजिक सुधारणांच्या कायम पाठीशी राहिले आहे. राजा राममोहन रॉय यांच्या विविध चळवळीचे, उपक्रमाचे, समाजसुधारणांचे महाराष्ट्राला कायम आकर्षण राहिले असून महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींना त्यांच्या कार्यकर्तृत्वाने प्रेरणा मिळाली आहे. आज महाराष्ट्र शासनही महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि सामाजिक न्याय यासाठी विविध योजना राबवत आहे. महिला व बालविकास विभागामार्फत महिलांच्या सुरक्षिततेसाठी, स्वावलंबनासाठी आणि आरोग्यासाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन, महिला बचतगटांचे सक्षमीकरण, बालविवाह प्रतिबंध, महिला अत्याचार प्रतिबंध, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना शासनाने स्वीकारल्या आहेत. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ', महिला स्वयंसहाय्यता गट, कौशल्य विकास कार्यक्रम, तसेच डिजिटल शिक्षण यांसारख्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.लाडकी बहीण योजनेच्या मार्फत महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचे व त्या माध्यमातून आर्थिक सुधारणांचे नवे दालन राज्य शासनाने उघडले आहे.

सामाजिक सुधारणा ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. राजा राममोहन रॉय यांनी दिलेला विवेक, समानता आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. अंधश्रद्धा, भेदभाव आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सामाजिक समतेचा, स्त्री-सन्मानाचा आणि प्रबोधनाचा विचार पुढे नेण्याचा संकल्प केला पाहिजे. हेच त्यांना त्यांच्या जयंती दिनाला खरे अभिवादन ठरेल.

**प्रवीण टाके**
उपसंचालक,
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर
९७०२८५८७७७

**दिन विशेष**

# आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन



जैविक विविधता म्हणजे पृथ्वीवर आढळणारी सजीवांची विविधता आणि त्यांच्यामधील परस्पर संबंध. यामध्ये वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव आणि त्यांची परिसंस्था या सर्वांचा समावेश होतो. पृथ्वीवरील जीवन टिकवून ठेवण्यासाठी जैविक विविधता अत्यंत महत्त्वाची आहे.

**जैविक विविधतेचे मुख्यत्वे तीन प्रकार पडतात :**

जनुकीय विविधता - एकाच प्रजातीच्या सजीवांमध्ये आढळणाऱ्या जनुकीय फरकांना जनुकीय विविधता म्हणतात. उदाहरणार्थ, तांदळाच्या हजारो जाती किंवा मानवामधील रंगाची व रूपाची विविधता. ही विविधता सजीवांना बदलत्या वातावरणात टिकून राहण्यास मदत करते.

प्रजातींची विविधता- एखाद्या विशिष्ट भागात राहणाऱ्या विविध सजीवांच्या प्रजातींची संख्या म्हणजे प्रजातींची विविधता. यामध्ये विविध प्रकारचे वृक्ष, पक्षी, कीटक आणि प्राणी यांचा समावेश होतो. (उदा. पश्चिम घाटातील वनस्पती आणि प्राण्यांची प्रचंड विविधता).

परिसंस्थेची विविधता - पृथ्वीवर वेगवेगळ्या प्रकारची भौगोलिक ठिकाणे आणि परिसंस्था आहेत; जसे की जंगले, वाळवंट, नद्या, समुद्र आणि गवताळ प्रदेश. प्रत्येक परिसंस्थेचे स्वतःचे वेगळे वातावरण आणि सजीव असतात.

दरवर्षी २२ मे हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन' म्हणून साजरा केला जातो. सजीवांचे संरक्षण आणि त्यांच्याबद्दल जागरूकता निर्माण करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. जैविक विविधतेचे महत्त्व खूप आहे.

पर्यावरणाचा समतोल: वनस्पती ऑक्सिजन देतात, तर कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. विविध कीटक आणि पक्षी परागीभवन करून अन्नधान्य निर्मितीला मदत करतात. अन्न आणि औषधे- आपल्याला मिळणारे बहुतांश अन्न, लाकूड आणि जीवनरक्षक औषधे ही निसर्गातील वेगवेगळ्या वनस्पती व सजीवांपासूनच मिळतात. दाट जंगले आणि विविध वनस्पती पावसाचे प्रमाण नियंत्रित ठेवतात आणि जमिनीची धूप थांबवतात. सध्या मानवी हस्तक्षेपामुळे जैविक विविधता वेगाने धोक्यात येत आहे. जंगलांची बेसुमार कत्तल आणि सजीवांच्या नैसर्गिक अधिवासाचा नाश.

वाढते प्रदूषण आणि जागतिक तापमानवाढ, प्राण्यांची अवैध शिकार आणि तस्करी यामुळे जैविक विविधतेला धोका निर्माण झाला आहे.

जैविक विविधतेचे रक्षण करणे ही केवळ सरकारचीच नाही, तर आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. स्थानिक पातळीवर वृक्षारोपण करणे, पाण्याचे स्रोत स्वच्छ ठेवणे आणि प्लास्टिकचा वापर टाळणे यातून आपण यात मोठे योगदान देऊ शकतो.

# वाढते तापमान आणि वन्यप्राणी

वाढते तापमान आणि वन्यप्राणी यांच्यातील संबंध सध्याच्या काळात अत्यंत संवेदनशील आणि गंभीर बनला आहे. दरवर्षी उन्हाळ्याचा पारा वाढल्यामुळे मानवाप्रमाणेच जंगलातील वन्यजीवांनाही मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाचा थेट फटका वन्यजीवांच्या जीवनशैलीवर, त्यांच्या अधिवासावर आणि अस्तित्वावर होत आहे.

या समस्येचे विविध पैलू आणि त्याचे वन्यप्राण्यांवर होणारे मुख्य परिणाम खालीलप्रमाणे आहेत: पाण्याचे दुर्भिक्ष आणि नैसर्गिक स्त्रोत आटणे उन्हाळ्यात जंगलातील लहान-मोठे पाझर, नदी-नाले आणि नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत कोरडे पडतात. पाण्यासाठी वन्यप्राण्यांना मैलोन्मैल भटकंती करावी लागते. तृषाकुल झालेले प्राणी अनेकदा पाण्याचा शोध घेत मानवी वस्तीकडे किंवा शेतांकडे वळतात, ज्यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष वाढतो. अन्नाची टंचाई आणि विस्कळीत झालेले अन्नचक्र वाढत्या उष्णतेमुळे वनस्पतींना अकाली बहर येतो किंवा पाने लवकर गळतात. त्यामुळे तृणभक्षी प्राण्यांना (उदा. हरिण, सांबर) चारा मिळणे कठीण होते. शाकाहारी प्राण्यांची संख्या खालावली किंवा त्यांचे स्थलांतर झाले, की वाघ, बिबट्या यांसारख्या मांसाहारी प्राण्यांच्या अन्नाचा प्रश्नही गंभीर बनतो.

**जंगलातील वणवे :** वाढत्या तापमानामुळे जंगलातील पालापाचोळा अत्यंत कोरडा होतो आणि किरकोळ घर्षण किंवा मानवी निष्काळजीपणामुळे वणवे लागतात. या आगीत केवळ मौल्यवान वनसंपदाच जळत नाही, तर शेकडो लहान वन्यजीव, सरपटणारे प्राणी, पक्षी आणि त्यांची अंडी-पिल्ले होरपळून मरतात. हवामान बदलामुळे अनेक पक्षी आणि प्राण्यांच्या नैसर्गिक प्रजनन चक्रात अडथळे निर्माण झाले आहेत. काही थंडीच्या प्रदेशातील किंवा डोंगराळ भागातील प्राणी (उदा. हिमालयातील स्नो लेपर्ड, कस्तुरी मृग) उष्णता असह्य झाल्यामुळे अधिक उंचीवर किंवा थंड ठिकाणांकडे स्थलांतर करत आहेत, ज्यामुळे त्यांचे मूळ अधिवास क्षेत्र आकुंचन पावत आहे. उष्माघात आणि आजारपण - तापमान ३८ अंश सेल्सिअस ते ४५ अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक वाढल्यास प्राण्यांनाही उष्माघाताचा तीव्र फटका बसतो.

शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने अनेक पक्षी आणि लहान प्राणी झाडांवरून कोसळून मृत्युमुखी पडतात. या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी वन विभाग आणि पर्यावरण संस्थांकडून विविध पातळीवर प्रयत्न केले जातात.

**नावात बदल**

माझे जुने नाव
**हेमा राजकुमार कल्याणी**
हे होते. पण माझे आता
नवीन नाव
**रिया हरीश गोस्वामी**
हे आहे.
माझे सर्व व्यवहार याच
नावाने ग्राह्य राहतील.
श्रीमती रिया हरीश गोस्वामी
सिंधी कॅम्प, पक्की खोली
संत कंवर पुतळ्या जवळ
अकोला - ४४४००१

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

३
सिटी न्यूज अकोला
शुक्रवार, दि. २२ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अकोला पूर्व मतदारसंघातील नागरिकांची पाण्यासाठी 2 ते 5 किमी. पायपीट

## ८४ खेडी पाणीपुरवठा योजनेचा बट्ट्याबोळ, दूषित पाण्याने जीव धोक्यात



**अकोट :** तालुक्यातील पातोंडा गावात पाणीटंचाईने भीषण रूप धारण केले असून आमदार रणधीर सावरकर यांच्या मतदारसंघातील नागरिकांना तब्बल २० ते ४० दिवसांपासून नियमित पाणी मिळत नसल्याने संताप उसळला आहे. महिलांना २ ते ५ किलोमीटर पायपीट करून जंगलातील विहिरी व वालावरून पाणी आणावे लागत असून गरीब नागरिकांचे अक्षरशः हाल होत आहेत. गावातील विहिरीतील हिरवेगार, दुर्गंधीयुक्त व दूषित पाणी नाईलाजाने बैल जोडी टू व्हीलर सायकल व पायदळ रात्रंदिवसाला आणून ते दूषित पाणी पिण्याची वेळ नागरिकांवर आली असून विविध आजारांचा धोका वाढला आहे. 'पाणी आणायचं की पोट भरायचं?' असा जिवंत सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. गावकऱ्यांना दोन वेळा टॅंकरने पाणी मिळाले यामध्ये अक्षरशः सरपंच विनोद सोळंके यांनी स्वतः डोकळे जीव जंतू दुर्गंधी क्षारयुक्त दूषित पाणी रात्रीच्या वेळी भरावे लागले, ८४ खेडी पाणीपुरवठा योजना फसली का? तुला चालवतो तरी कोण असा प्रश्न उपस्थित होत असून गावकऱ्यांनी आमरण उपोषण व चक्काजाम आंदोलनाचा इशारा दिला आहे. 'मतदानावेळी हात जोडणारे नेते आता तहानलेल्या जनतेकडे पाठ फिरवत आहेत,' असा संतप्त आरोप महिलांनी केला आहे. आ. सावरकर यांनी दिलेला शब्द पाळावा, अशी मागणी आहे.

बायपास वरून अधिकाऱ्यांनी सप्लाय बंद केला आहे गावांमध्ये पाणी २० ते ३० दिवस पोचत नाही दुर्गंधी जीव जंतू असलेले दूषित पाणी पिण्याची ही वेळ आली आहे तरीही आमदार आमदारांनी आश्वासन दिल्यानुसार स्वच्छ पाणी केव्हा देणार याकडे लक्ष लागले असून न मिळाल्यास आम्ही सर्व गावकरी आंदोलन करू.

**विनोद सोळंके**
पातोंडा गट ग्रामपंचायत सरपंच,
गरसोळी व पातोंडा

-------------------

गावाला हप्त्यातून बुधवार गुरुवार शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येतो पातोंडा गावाला बायपास द्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता परंतु मुख्य लाईन वरून बायपास मुळे खानापूर्ँ वरील १७ गावांना पाणीपुरवठा बरोबर होत नव्हता सदर बायपास बंद केल्यामुळे खोटे आरोप आणि तक्रारी करण्यात येत आहेत,

**निखिल राऊत,** म.जि.प्रा. वि.आकोट,

# महिला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष जिल्हाध्यक्षपदी मनीषा गजाननराव महल्ले



प्रतिनिधी २२ मे

**अकोला :** महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या 'अकोला ग्रामीण महिला जिल्हाध्यक्षपदी सौ. मनीषा गजाननराव महल्ले यांची नियुक्ती झाली. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष रोहिणीताई खडसे यांचे त्यांनी आभार मानले.

त्यांना अकोलातील एका कार्यक्रमात निरीक्षक डॉ. भीमराव हतीअंबीरे, जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे, आशाताई मिरगे यांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले. ग्रामीण व शहरी भागातील समस्या मागी लावण्यासोबत महिला प्रश्ननांवर लढा देणारे सौ. मनिषा महल्ले यांना जिल्हा अकोला महिला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार जिल्हा महासचिव पदाची जबाबदारी देण्यात आली होती. यापूर्वी सुध्दा त्यांनी हे पद यशस्वी रित्या भूषविले होते सौ मनिषा महल्ले यांच्या नियुक्तीने राष्ट्रवादी महिला मध्ये नव चेतन्य निर्माण झाले आहे ते आपल्या नियुक्तीचे श्रेय माजी राज्यमंत्री गुलाबराव भाऊ गावंडे, संतोषदादा कोरपे, निरीक्षक डॉ. भीमराव हतीअंबीरे, डॉ. आशाताई मिरगे, जिल्हाध्यक्ष संग्राम भैय्या गावंडे यांच्या मार्गदर्शनात पक्षाचे काम करणार असल्याचे सौ. मनीषा गजाननराव महल्ले यांनी सांगितले.

नियमित वाचा सिटीन्यूज सुपरफास्ट

# बाळापूर पोलिसांनी गोधन आणि गोमांस केले जप्त



**बाळापूर :** पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून गोधन आणि गोमांस जप्त करण्यात आले. मटन मार्केट परिसरात अब्दुल जब्बार अब्दुल सत्तार याचे कडुन ४५ किलो गोमांस, सैयदपुरा भागात अब्दुल रउफ अब्दुल रफिक कडून ८० किलो गोमांस, किल्याजवळ अशफाक शाह आदिल शाह कडून ११० किलो गोमांस असा ४७,००० रूपयाचे गोवंश जप्त करण्यात आले.

तसेच सरकारी दवाखाना बाळापूर येथे केलेल्या नाकाबंदी दरम्यान प्रमोद गावंडे रा. बाभुळगांव, ता. पातुर, मोहम्मद सलीम शेख मजीद रा. वाडेगांव यांच्या कडुन एक बैल लाल पांढ-या रंगाचा शिंगे मोठे, एक गो-हा लाल रंगाचा व एक गो-हा लाल रंगाचा अशी तीन जनावरे आणि बोलेरो पिकअप ४,५५,००० रू चा माल जप्त केला.

तर, मोहम्मद नजीम शेख अकील जमदार प्लॉट पातुर कडुन एक बैल पांढ-या रंगाचा शिंगे मोठे, एक बैल लाल रंगाचा, एक बैल काळसर पांढ-या रंगाचा, एक बैल लालसर रंगाचा अशा वर्णनाचे चार गोवंश व जुनी बोलेरो पिकअप असा ४,९५,००० रु.चा माल. दोन्ही कारवाईत ९,९७,०००/रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिस निरीक्षक प्रकाश झोडग., उपनिरीक्षक शरद सैंदाणे., उपनिरीक्षक वैशाली पाटील., पोहेकॉ सोहेल खान, शुभम गई, सुमीत क्षीरसागर, संदीप पेड यांच्या पथकाने कारवाई केली.

# संभाजी बिग्रेडचे मोटेगावकर क्लासेसमध्ये ठिय्या आंदोलन



**अकोला :** देशभर गाजत असलेल्या नीट युजी २०२६ पेपर फुटी प्रकरणाच्या तपासाला वेग आला असून केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने सीबीआय नागपूर व चंद्रपूर कार्यालयाने जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथे धाड सत्र राबविले.

मोटेगावकर यांना यापूर्वी सीबीआयने अटक केली असून त्यांनी प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका काही जणांपर्यंत पोहोचवल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे अकोला शहरात २ दिवसापूर्वी संभाजी ब्रिगेडने मोटेगावकर क्लासेस वर शेण फेक करून आंदोलन केले होते यानंतर आज पुन्हा मोटेगावकर क्लासेस अचानक सुरू झाल्यामुळे या प्रकरणाची संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना माहिती मिळताच संभाजी बिग्रेड च्या कार्यकर्त्यांनी मोठे गावकर क्लासेस वर ठिय्या आंदोलन सुरू केले आज संभाजी ब्रिगेडच्या वतीने मोटेगावकर क्लासेस येथे संभाजी ब्रिगेड चे ?क्टिव्ह महानगर अध्यक्ष देवा गावंडे हर्षल इंगळे, पंकज बजोड कैलास ताले सिधार्थ तायडे ऋषभ काळे हे

क्लास वर गेले चौकशी कामी गेले असता सर्व क्लासचे जबाबदार व्यक्ती तिथून पळून गेली व महिलांना पुढे केले उत्तर देत त्यांनी दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला संभाजी ब्रिगेड च्या वतीने त्यांना सांगण्यात आले मोठे गावकर या नावाखाली कोणताही विद्यार्थी घडणार नाही आणि क्लास बंद करावा असे खडे बोल सुनावल्यानंतर कर्मचाऱ्यांनी क्लासचे बोर्ड काढून टाकले व आम्ही क्लास बंद करणार आहोत असे उपस्थित अधिकारी यांनी सांगितले या नंतर ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले सदर क्लासेस सील करण्यासाठी देवा गावंडे महानगर अध्यक्ष संभाजी ब्रिगेड यांच्यावतीने जिल्हाधिकारी यांना लेखी पत्र देण्यात येईल अशी माहिती संभाजी ब्रिगेड च्या वतीने देण्यात आली

# महिलांसाठी आता जिल्हास्तरावर 'पीसीओडी क्लिनिक' सुरू

प्रतिनिधी २२ मे

**अकोला :** महिलांच्या हार्मोनल व प्रजनन आरोग्य समस्यांवर उपचार सुविधांसाठी जिल्हा स्तरावर 'पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसीज (पीसीओडी) क्लिनिक' सुरू करण्यात आली आहेत. सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून सार्वजनिक आरोग्य विभागाने महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या पीसीओडी समस्येवर वेळेत निदान, उपचार आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी हा नवीन विशेष उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या सुविधेचा जास्तीत जास्त महिलांना लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. राज्य कुटुंब कल्याण कार्यालयाने यासंदर्भात सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांना तज्ज्ञ उपचार आणि मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

पीसीओडी ही महिलांमध्ये आढळणारी हार्मोनल समस्या असून त्याचा परिणाम मासिक पाळीतील अनियमितता, वजन वाढ, वंध्यत्व, मानसिकॅ ताण, त्वचेच्या समस्या तसेच इतर आरोग्यविषयक गुंतागुंतांवर होत असतो. विशेषतः किशोरवयीन व प्रजननक्षम वयोगटातील महिलांमध्ये या समस्येचे प्रमाण वाढत असल्याने राज्य शासनाने यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, स्त्री रुग्णालये, १०० खाटांची उपजिल्हा रुग्णालये तसेच महानगरपालिका रुग्णालयांमध्ये पीसीओडी क्लिनिक सुरू करण्यात आली आहेत. ही क्लिनिक दर बुधवारी 'मेनोपॉज ओपीडी' सोबत चालविण्यात येतील.

ज्या रुग्णालयांमध्ये नियमित स्त्रीरोग तज्ज्ञ उपलब्ध नसतील, त्या ठिकाणी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नियुक्त स्त्रीरोग तज्ज्ञांची सेवा घेण्यात येणार आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृतीसाठी उपसंचालक, आरोग्य सेवा तसेच आयईसी विभाग यांच्यामार्फत विशेष समन्वय साधण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील लाभार्थी महिलांची माहिती, तपासणी, निदान व उपचार यांचा नियमित अहवाल शासनाकडे सादर करण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे महिलांमध्ये पीसीओडी संदर्भातील जागरूकता वाढण्यास मदत होणार असून वेळेत निदान व उपचार मिळाल्याने भविष्यातील गंभीर आरोग्य समस्या टाळण्यास मोठा हातभार लागणार आहे.

# ऑपरेशन 'प्रहार'ची धडक ; अकोट ग्रामीण पोलिसांची अवैध दारू अड्डयांवर कारवाई



प्रतिनिधी २२ मे

**अकोट :** 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अकोट ग्रामीण पोलिसांनी अवैध गावठी दारू गाळणारे व देशी दारूची बेकायदा विक्री करणाऱ्या पाच आरोपींवर धडक कारवाई करत तब्बल ८२ हजार ७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गुरुवारी (दि. २१) ही कारवाई करण्यात आली.

पोलीस स्टेशन अकोट ग्रामीण हद्दीत पेट्रोलिंगदरम्यान गुप्त माहितीच्या आधारे पोटपखेड शेतशिवारात हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या इसमावर छापा टाकण्यात आला. यावेळी सडवा मोहाम व हातभट्टीची दारू असा ६० हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तसेच ग्राम कुंड येथे अवैध देशी दारू विक्री करणाऱ्या आरोपीकडून १० हजार २०० रुपये, आसेगाव बाजार येथून ३ हजार २०० रुपये, रंभापूर येथून २ हजार २०० रुपये आणि मुंडगाव येथून ५ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार किशोर जुनघरे व पथकाने केली.

# देशातील युवकांविषयीच्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी राष्ट्रपतींना ई-मेलद्वारे निवेदन

प्रतिनिधी २२ मे



**अकोला :** 'राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचन्द्र पवार'चे प्रदेश संघटक सचिव जावेद जकारिया यांनी देशातील युवकांविषयी माननीय मुख्य न्यायाधीशांनी केलेल्या कथित वादग्रस्त वक्तव्याच्या निषेधार्थ महामहिम राष्ट्रपती यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून योग्य कारवाई करण्याची मागणी केली आहे.

जावेद जकारिया यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, दिनांक १५ मे २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान देशातील युवकांबाबत 'कॉकरोच' असा शब्द वापरल्याची माहिती माध्यमांतून समोर आली. या वक्तव्यामुळे देशातील कोट्यवधी युवकांच्या भावना दुखावल्या गेल्या असून समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.ते म्हणाले की, आज देशातील युवक बेरोजगारी, महागाई, स्पर्धा परीक्षांमधील अनियमितता आणि रोजगाराच्या अभावामुळे मोठ्या संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत युवकांविषयी अपमानास्पद किंवा टोमणेखोर वक्तव्य करणे अत्यंत दुर्दैवी आहे. देशाचा युवक हा भारताच्या प्रगतीचा आणि भविष्याचा मजबूत आधार असून त्यांना प्रोत्साहन व सन्मान मिळणे आवश्यक आहे.या प्रकरणाची सखोल चौकशी करून भविष्यात कोणत्याही संवैधानिक पदावरील व्यक्तीकडून युवकांच्या सन्मानाला धक्का पोहोचेल असे वक्तव्य होऊ नये, यासाठी योग्य संवैधानिक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जावेद जकारिया यांनी राष्ट्रपतींकडे केली आहे.

देशातील युवकांच्या भावना लक्षात घेऊन राष्ट्रपती महोदया या गंभीर विषयात हस्तक्षेप करून न्याय देतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## निधन वार्ता

**रत्नीबाई अग्रवाल**



**अकोला :** येथील लाला लजपतराय सोसायटी मधील रहिवासी श्रीमती रत्नीबाई रामगोपालजी अग्रवाल यांचे २१ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ॲड. देवेंद्र अग्रवाल यांच्या त्या मातोश्री होत.

# सेवा फाउंडेशनचे मनपा आयुक्त आणि महापौरांना निवेदन

## जन्म-मृत्यू विभागात मूलभूत सुविधा द्या

प्रतिनिधी २२ मे



**अकोला :** महानगरपालिका आयुक्त, महापौर आणि उपमहापौर यांना सेवा फाउंडेशनच्या टीमने एकत्रितपणे भेटून निवेदन सोपवले. या निवेदनाद्वारे प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, नागरिकांना सुविधा न मिळाल्यामुळे त्यांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे म्हटले आहे.

महानगरपालिका प्रशासनाने आधी जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी कार्यालय शहरापासून दूर हलवले होते. आता ते टिळक रोडवरील भरतिया रुग्णालयात स्थलांतरित करण्यात आले आहे. येथे कार्यालय तर आहे, पण सुविधा मात्र काहीच नाहीत. नागरिकांना महानगरपालिकेने कोणत्या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, याबाबत सेवा फाउंडेशनने मागण्यांसह प्रशासनाला सूचित केले आहे. कार्यालयात नागरिकांसोबतच शासकीय कर्मचाऱ्यांनाही उघड्यावर शौचास जावे लागत आहे. लवकरात लवकर शौचालय बांधण्यात यावे. थंड पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर कुलर प्लांट बसवण्यात यावा. नागरिकांचे ऊन आणि पावसापासून संरक्षण करण्यासाठी टीन शेड उभारण्यात यावे. पावसाळ्यापूर्वी संपूर्ण परिसरात आर.सी.सी. सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता किंवा पेव्हर ब्लॉक बसवण्यात यावेत.

महिला, वृद्ध आणि सर्व नागरिकांसाठी बसण्याची योग्य व्यवस्था करण्यात यावी. जर महानगरपालिका प्रशासनाने या मागण्या आणि सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून दिल्या नाहीत, तर येत्या काळात तीव्र आंदोलन करण्यात येईल. या मागण्यांचे निवेदन देण्यासाठी सेवा फाउंडेशनचे जाहेद हुसैन, मो. शाकीर भाई, झाकीर शाह, शेख इरशाद, चांद खान आणि कफिल भाई उपस्थित होते.



# थकीत वीजबिल धारकांना 'करंट'; सलग तिसऱ्या दिवशी धडक कारवाई

## ५० लाखांच्या थकबाकीप्रकरणी २७ ग्राहकांचे मीटर काढले; पांढरपेशीही रडारवर

प्रतिनिधी २२ मे



**यवतमाळ :** महावितरणकडून थकीत वीजबिलदार आणि वीज चोरी करणाऱ्यांविरोधात सलग तिसऱ्या दिवशीही धडक कारवाई सुरू ठेवण्यात आली आहे. विशेष मोहिमेअंतर्गत तब्बल ५० लाख रुपयांची थकबाकी असलेल्या २७ ग्राहकांवर कारवाई करण्यात आली असून संबंधितांचे वीज मीटर काढून त्यांचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला.

महत्त्वाचे म्हणजे या कारवाईत काही पांढरपेशी तसेच प्रतिष्ठित व्यक्तींचाही समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली. वारंवार नोटीस बजावूनही थकबाकी न भरल्याने अखेर कठोर कारवाईचा बडगा उगारण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

यापूर्वीही महावितरणने शहरातील आलिशान बंगल्यांवर धाडसत्र राबवत वीज चोरी करणाऱ्यांवर जवळपास एक कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. वाढती थकबाकी आणि वीज चोरीमुळे विभागाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याने आगामी काळातही ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या कारवाईमुळे वीज चोरी करणारे तसेच वीजबिल थकविणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. आतापर्यंत कारवाई केवळ सामान्य नागरिकांपुरती मर्यादित असल्याची भावना होती. मात्र आता प्रतिष्ठित आणि धनदांडग्या थकबाकीदारांवरही कारवाई होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांकडून मोहिमेचे स्वागत केले जात आहे.

# 'NEET' घोटाळा आणि पीक विम्यावरून युवक काँग्रेस आक्रमक

## बाभुळगाव तहसीलवर धडक; सरकारला तीव्र आंदोलनाचा इशारा



प्रतिनिधी २२ मे

**बाभुळगाव :** 'NEET' पेपरफुटी प्रकरणातील कथित गैरव्यवहार आणि यवतमाळ जिल्ह्याला पीक विमा नुकसानभरपाईतून वगळल्याच्या मुद्द्यावरून बाभुळगाव तालुका युवक काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत तहसील कार्यालयावर धडक दिली. तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवत विद्यार्थ्यांना आणि शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी करण्यात आली.

युवक काँग्रेसच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात 'NEET' पेपरफुटी प्रकरणाला शिक्षण व्यवस्थेवरील गंभीर आघात ठरवत संताप व्यक्त करण्यात आला. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच या प्रकरणातील परीक्षा माफिया आणि कथित राजकीय संरक्षणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

### "सरकारने तातडीने न्याय द्यावा"

■ "'NEET' पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर घाला घातला गेला आहे, तर पीक विम्यातून यवतमाळ जिल्ह्याला वगळून शेतकऱ्यांवर अन्याय करण्यात आला आहे. सरकारने तातडीने कारवाई करून दोन्ही घटकांना न्याय द्यावा; अन्यथा युवक काँग्रेस आणखी तीव्र आंदोलन उभारेल."
- अमेय घोडे, तालुकाध्यक्ष, युवक काँग्रेस, बाभुळगाव

दुसऱ्या निवेदनात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले. बाभुळगावसह यवतमाळ जिल्ह्यातील अनेक भागांतील सोयाबीन आणि कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असतानाही जिल्ह्याला पीक विमा नुकसानभरपाई योजनेतून वगळण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. नियमितपणे विमा हप्ते भरूनही शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवणे हा अन्याय असल्याचे आंदोलनकर्त्यांनी म्हटले.

"अस्मानी संकटानंतर आता प्रशासनाच्या सुलतानी धोरणांचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे," असा आरोप करत जिल्ह्याचा तातडीने पीक विमा योजनेत समावेश न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

या आंदोलनात युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अमेय घोडे, उपाध्यक्ष रेहान खान पठाण, राजेश काटेकर, विनोद वाटमोडे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पांडुरंग लांडगे, सुनील मते, प्रदीप नंदुरकर, अंकुश सोयाम, अभिषेक बहिरे, प्रतीक गणवीर, विपुल बोदडे, असीन दहाट, संकेत देशमुख, समाधान डफळे, अर्जुन मेश्राम, अक्षय दिगुरे, श्रावण शिवरकर, सुभोध नगराळे, विलास चांदेकर, सुयोग आराडे, सारंग गुजर, संदेश आखरे आदींसह युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पुनर्वसन

## भारतीय जैन संघटनेचा पुढाकार; वाघोली प्रकल्पात मोफत शिक्षणाची संधी

प्रतिनिधी २२ मे




**यवतमाळ :** भारतीय जैन संघटना गेल्या अनेक वर्षांपासून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी कार्यरत असून, अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी विशेष उपक्रम राबवत आहे. सन २०१४ पासून विद्यार्थ्यांना वाघोली येथील शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पात दाखल करून शिक्षण, निवास, भोजन, वसतीगृहासह सर्व आवश्यक सुविधा विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

मागील दोन वर्षांत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पुणे येथे आणण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. त्यानुसार इयत्ता पाचवी व सहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींना बारावीपर्यंतचे शिक्षण वाघोली येथील प्रकल्पात दिले जाणार आहे.

या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील २० जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून, संबंधित कुटुंबांची अधिकृत यादी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाल्याची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या निवड व समन्वयाची जबाबदारी भारतीय जैन संघटनेचे विदर्भ सचिव शेखर बंड यांच्याकडे जिल्हाप्रमुख म्हणून सोपविण्यात आली आहे. त्यांच्यासह जिल्हा समन्वयक मनीष बनसोड, तालुका समन्वयक, पदाधिकारी व कार्यकर्ते आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या भेटी घेऊन इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसाठी मार्गदर्शन करणार आहेत.

शैक्षणिक वर्ष १५ जून २०२६ पासून सुरू होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात माहिती देताना शेखर बंड यांनी यापूर्वी जिल्ह्यातील ४१ तसेच सन २०१६ मध्ये ५८ विद्यार्थ्यांना वाघोली पुनर्वसन केंद्रात शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्याचे सांगितले.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विदर्भ अध्यक्ष संदीप मुनोत, विदर्भ सचिव शेखर बंड, कार्यकारिणी सदस्य महेंद्र बोरा, दिलीप रेदासनी, कीर्ती मुथा, वंदना बोरंदिया, जिल्हाध्यक्ष सुशील कटारिया, विनय मुनोत, रुपेश भंडारी आणि डॉ. सारिका शहा यांनी केले आहे.

# शिर्डीत चातारीच्या सुपुत्राचा राज्यस्तरीय गौरव

प्रतिनिधी २२ मे

**उमरखेड :** सामाजिक बांधिलकी जपत उपेक्षित घटकांसाठी सातत्याने कार्य करणारे उमरखेड तालुक्यातील चातारी येथील भागाजी शिवरतवाड यांना शिर्डी येथे आयोजित राज्यस्तरीय 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार सोहळा २०२६'मध्ये सन्मानित करण्यात आले. साईनगरी शिर्डीत १७ मे रोजी झालेल्या या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजसेवकांचा गौरव करण्यात आला.

गावातील निराधार नागरिक, विधवा महिला, अनाथ मुले तसेच शेतमजुरांसाठी शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या क्षेत्रात भागाजी शिवरतवाड यांनी अनेक वर्षांपासून सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या या सामाजिक योगदानाची दखल घेत मान्यवरांच्या हस्ते त्यांना गुणगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यास राज्यातील राजकीय, सामाजिक व उद्योग क्षेत्रातील मान्यवरांसह मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील कलाकारांची उपस्थिती होती. पुरस्कारार्थींना सन्मानचिन्ह,



शाल आणि श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

"हा सन्मान केवळ माझा नसून चातारी गावातील कष्टकरी आणि गरजू नागरिकांचा आहे. साईबाबांच्या आशीर्वादाने समाजसेवेचे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवणार," अशी भावना भागाजी शिवरतवाड यांनी व्यक्त केली.

भागाजी शिवरतवाड यांच्या या राज्यस्तरीय सन्मानामुळे चातारी गावासह उमरखेड तालुक्यात आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# भरधाव कारची सायकलस्वाराला धडक; शेतकऱ्याचा मृत्यू

प्रतिनिधी २२ मे

**उमरखेड :** विडूळ-ढाणकी मार्गावर भरधाव कारने सायकलस्वाराला जोरदार धडक दिल्याने एका शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली. या प्रकरणी निष्काळजी वाहनचालकाविरोधात उमरखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आनंता देविदास धुळे (वय ४५, रा. विडूळ) असे मृतकाचे नाव आहे. याप्रकरणी त्यांचे भाऊ रावनाजी देविदास धुळे यांनी पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आनंता धुळे हे गुरुवारी



सकाळी सुमारे सहा वाजताच्या सुमारास शेतातील दूध आणण्यासाठी सायकलने निघाले होते. विडूळ गावाजवळील ढाणकी रोडवर दिल्लेवार व गणेश रणमले यांच्या शेताजवळ ते पोहोचले असता, समोरून येणाऱ्या एमएच ३२ वाय ५०२८ क्रमांकाच्या स्विफ्ट डिझायर कारने त्यांच्या सायकलला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की, धुळे हे रस्त्यावर फेकले गेले. त्यांच्या डोक्याला, छातीला, पायाला व नाकाला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. घटनेनंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. या प्रकरणी कार चालकाविरोधात निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडवून आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राथमिक तपास पोलीस उपनिरीक्षक अमर खिल्लारे व पोलीस कर्मचारी दीपक वाघमारे करीत असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार दिलीप चव्हाण करीत आहेत.

# शिक्षण हीच प्रगतीची गुरुकिल्ली : राजेश आडे

## लोणी येथे सेवानिवृत्त कामगार उपायुक्तांचा सत्कार; सामाजिक बांधिलकी जपण्याचा निर्धार

प्रतिनिधी २२ मे

**आर्णी :** "समाजाची प्रगती शिक्षणाशिवाय शक्य नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र आजही तितकाच महत्त्वाचा आहे. आरक्षणामुळेच माझ्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला अधिकारी होण्याची संधी मिळाली," असे प्रतिपादन सेवानिवृत्त कामगार उपायुक्त राजेश आडे यांनी केले.

लोणी येथील नवयुवक पंचशील मंडळाच्या वतीने बुद्ध विहारात आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी वाहून घेण्याचा मनोदयही त्यांनी यावेळी व्यक्त केला.



समारंभाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक हेमंतकुमार कांबळे होते. गावातून शिक्षण घेऊन मोठे झालेल्या व्यक्तींनी आपल्या गावाशी नाळ कायम ठेवणे गरजेचे असल्याचे सांगताना त्यांनी राजेश आडे यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. "सुशिक्षितांनी राजकारणात सहभागी झाले नाही, तर अयोग्य लोक सत्तेवर येतात," असे स्पष्ट मतही त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेंद्र सोनोने यांनी केले. यावेळी सरपंच अमोल वारंगे, माजी सरपंच वसंत खारोळ, ग्रामपंचायत सदस्य बालू गायधने, सामाजिक कार्यकर्ते मनोज नागापुरे, अमित रामटेके आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश सोनटक्के, प्रवीण सोनटक्के, यशवंत मसादकर आणि गौतम साखरकर यांनी परिश्रम घेतले. दरम्यान, राजेश आडे यांचा गावातील विविध संस्थांच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. महादेव संस्थानच्या वतीने भावेश लाड, उत्तम जाधव, प्रणव वारंगे, शुभम देशमुख आणि प्रथमेश चौधरी यांनी त्यांचा गौरव केला. तसेच सेवालाल मंदिरात जीवन वडते, रामलाल वडते, शिवराम वडते, पुनम राठोड आणि तुकाराम राठोड यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

# पैनगंगा नदीपात्रातून रेतीचा अवैध उपसा

प्रतिनिधी २२ मे

**पारवा :** परिसरातून वाहणाऱ्या पैनगंगा नदीच्या पात्रातून मोठ्या प्रमाणात रेतीचा अवैध उपसा केला जात आहे. रात्रीच्या वेळी ट्रक, ट्रॅक्टरद्वारे रेतीची वाहतूक करण्यात येत आहे. जेसीबीद्वारे रेतीचा बेसुमार उपसा करण्यात येत आहे. सगदा, भीमकुंड, गनेरी, राजापेठ, ताडसावळी आदी गाव शिवारात हा प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू आहे. महसूल विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. रात्रीच्या वेळी महसूल विभागाचे पथक फिरकत नसल्यामुळे हा प्रकार वाढीस लागला आहे. मंडळ अधिकारी, तलाठी मुख्यालयी राहत नसल्याची संधी रेती तस्करांकडून साधली जात आहे. पारवा, कुर्ली मंडळ अधिकारी, तलाठी मुख्यालयाला मिळणे कठीण झाले आहे. यामुळे गौण खनिजाची चोरी वाढली आहे.

# बाराखिंडी दत्तात्रय प्रभू देवस्थानात पंचावतार उपहार व अन्नदान महोत्सव

## गुरूभक्ती, नामस्मरण आणि अन्नदानाने परिसर भक्तिमय

प्रतिनिधी २२ मे

**उमरखेड :** "॥ सर्वज्ञ कृपा ॥" या मंगलमय घोषात आणि गुरूभक्तीच्या वातावरणात बाराखिंडी दत्तात्रय प्रभू देवस्थान येथे १७ वा पंचावतार उपहार व अन्नदान सप्ताह भक्तिभावात संपन्न झाला. विदर्भातील महानुभाव पंथीयांसाठी श्रद्धास्थान असलेल्या या देवस्थानात पाचशेहून अधिक भाविकांनी उपस्थिती लावत धार्मिक सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

अकरा दिवस चाललेल्या या महोत्सवात नामस्मरण, अन्नदान, प्रवचन, भक्तिसोहळे आणि विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. समारोप २० मे रोजी भक्तिमय वातावरणात पार पडला.

या उपक्रमाची प्रेरणा कै. प.पू. संदीपान बाबा बेलापूरकर यांच्या कार्यातून मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले. सलग १६ वर्षे त्यांनी



हा धार्मिक उत्सव समर्पणाने उभारला होता. २१ वर्षे अखंड महोत्सव सुरू ठेवण्याचा त्यांचा संकल्प होता. त्यांच्या निधनानंतर हा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी शिष्य परिवाराने स्वीकारली असून त्याच संकल्पपूर्तीतून यंदाचा १७ वा सोहळा पार पडला.

सोहळ्यासाठी प.पू. महंत विश्वनाथ बाबा कोठी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी शिष्य परिवाराला सहकार्य करत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला.

गोकुळाई तेल्हारकर, मंगलाई कोठी तसेच विविध स्तरांवरील शिष्यांनी आयोजनात सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गजानन देशमुख, मनीषा देशमुख, युवराज पाटील तसेच साकळी (बुद्रुक), सेवगा, चिखली मळगाव येथील शिव परिवार आणि सेवाभावी कार्यकर्त्यांनी विशेष योगदान दिले.

यावेळी महिला शिष्य भगिनींना आदिचोळीचा आहेर देण्यात आला. तसेच धोंडे, पुरणपोळी आणि विविध मिष्ठान्न भोजनाचा प्रसाद भाविकांना वितरित करण्यात आला. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

संपूर्ण कार्यक्रम देवस्थानाचे उपाध्यक्ष भीमराव पाटील चंद्रवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# जिल्हा काँग्रेस अध्यक्ष नियुक्तीवर फेरविचाराची मागणी

## मोहम्मद आसिम अली यांची पक्ष नेतृत्वावर टीका; अनुभवी नेतृत्वाला संधी देण्याची अपेक्षा

प्रतिनिधी २२ मे

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नव्या जिल्हाध्यक्ष नियुक्तीवर काँग्रेसचे कार्यकर्ते तथा नई परवाज मूव्हमेंट चे संस्थापक अध्यक्ष मोहम्मद आसिम अली यांनी नाराजी व्यक्त करत पक्ष नेतृत्वाने या निर्णयावर फेरविचार करावा, अशी मागणी केली आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या जिल्हाध्यक्षांकडे आवश्यक संघटनात्मक अनुभव, व्यापक जनाधार आणि जिल्ह्यातील १६ तालुक्यांमधील प्रभावी संपर्क नसल्याचे दिसून येते. मोठी निवडणूक न लढवलेल्या व्यक्तीकडे अशी जबाबदारी सोपविणे संघटनेसाठी नुकसानकारक ठरू शकते, असेही त्यांनी नमूद केले. याउलट डॉ. नदीम यांच्यासारख्या अनुभवी आणि जनाधार असलेल्या नेत्याला डावलण्यात आल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. नगर परिषद, विधानसभा यांसह विविध निवडणुका लढविण्याबरोबरच अनेक सामाजिक आंदोलनांचे नेतृत्व डॉ. नदीम यांनी केले असल्याचे त्यांनी म्हटले. एआयसीसीकडून नियुक्त निरीक्षकांनी पक्षश्रेष्ठींकडे चुकीची

■ काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मांडलेल्या "ज्याची जितकी संख्या, त्याला तितकी भागीदारी" या भूमिकेचा उल्लेख करत अल्पसंख्याक, दलित आणि आदिवासी समाजाला पक्ष संघटनेत अपेक्षित प्रतिनिधित्व दिले जात नसल्याची टीकाही त्यांनी केली. यामुळेच काही प्रमाणात ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन सारख्या पक्षांना बळ मिळत असल्याचा आरोप त्यांनी केला.

माहिती पोहोचवल्याचा आरोप करत या प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध असल्याचा दावा करत, काही दिवसांपूर्वी राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट दिल्याचाही उल्लेख त्यांनी केला. विरोधी विचारसरणीशी जवळीक असलेल्या व्यक्तीला काँग्रेससारख्या वैचारिक पक्षाचे जिल्हाध्यक्ष बनविणे चिंताजनक असल्याचे त्यांनी म्हटले.

संबंधित व्यक्ती हिंगोली लोकसभा मतदारसंघातून इच्छुक असल्याचे सांगत, त्यांना संघटनात्मक जबाबदारी द्यायचीच असल्यास ती हिंगोलीत द्यायला हवी होती, असेही त्यांनी नमूद केले. अनुभवी, जनाधार असलेल्या तसेच सामाजिक न्यायाच्या मूल्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तीची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करावी, अशी मागणी मोहम्मद आसिम अली यांनी शेवटी केली आहे.

सिटी न्यूज अमरावती

शुक्रवार, दि. २२ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिवसानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात शपथ

**अमरावती:** भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी २१ मे रोजी 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस'साजरा केला जातो. यानिमित आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी गोविंदा दानेज यांनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची अधिकारी-कर्मचाऱ्यांना शपथ दिली.

दहशतवादाचा व हिंसाचाराचा सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा यावेळी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीसोबत दुराचार करणाऱ्यास शिक्षा

प्रतिनिधी २२ मे

**अमरावती :** १९/०१/२०२२ रोजी ग्राम सोनेगांव, ता. अजंनगांव सुजी, जि. अमरावती येथील एका ६५ वर्षीय महीलेने तक्रार दिली की, त्यांची १० वर्षीय अल्पवयीन नात ही त्यांच्या सोबत राहत असुन तिच्या आई-वडीलांचे आपसात पटत नसल्याने ते वेगळे राहतात.

फिर्यादी ही शेतात कामा करिता गेली असतांना त्यांची १० वर्षीय नात ही दि.१६/०१/२०२२ रोजी घराचे अंगणात खेळत असतांना शेजारी अजय धर्मा वानखडे ऊर्फ अजय बापुराव तेलगोटे २९ वर्षे हा तेथे आला व त्याने पिडीत मुलीचा हात धरून शेजारील खोलीत घेवुन गेला व तेथे त्याने अल्पवयीन पिडीत मुलीवर लैंगिक अत्याचार केला. फिर्यादी शेतातुन घरी परत आल्यावर पिडीतेने आपल्या आजीला सांगितले. वरून फिर्यादीने पो.स्टे.ला येवुन दिलेल्या फिर्यादीवरून पो.स्टे. रहीमापुर येथे कलम ३७६ (अ) (ब) भा.दं.वि. सहकलम ४,६ पोक्सो अन्वये नोंदवण्यात आला होता.

## ◆ उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र



गुन्हयाचा तपास पो.उप.नि. कपिल मिश्रा यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. सदर प्रकरण अतीरिक्त सत्र न्यायालय, दर्यापुर येथे चालविण्यात आले. त्यामध्ये सोनाली क्षीरसागर यांनी शासना तर्फे अभियोक्ता म्हणुन तसेच स.पो.उप.नि. राजकुमार बोडखे यांनी पैरवी अधिकारी म्हणून काजकाज पाहिले. सर्व पुराव्यांची पडताळणीअंती वि. अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायालय दर्यापुर यांनी दि.२०/०५/२०२६ रोजी आरोपी अजय धर्मा वानखडे ऊर्फ अजय बापुराव तेलगोटे यास २० वर्षे सश्रम कारावास व १५,०००/- दंड तसेच दंड न भरल्यास ०३ महीने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. तपास अधिकारी कपील मिश्रा, पो.उप.नि. पैरवी अधिकारी राजकुमार बोडखे यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगीरी बाबत निकेतन कदम, भा.पो.से., पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रा. यांनी आज रोजी त्यांना प्रशस्तीपत्र व पुष्प देवुन सन्मानित केले आहे.

**अल्पवयीन मुलासोबत दुराचार करणाऱ्यास शिक्षा**

**अमरावती :** ११/०४/२०२५ रोजी ग्राम निंबोली, ता.धामणगांव रेल्वे येथील ३९ वर्षीय व्यक्तीने फिर्याद दिली की, त्याचा १० वर्षीय अल्पवयीन मुलगा सायंकाळी ०७.०० ते ०८.०० वाजता च्या दरम्यान आठवडी बाजार येथे खेळत असताना यातील आरोपी विवेक देविदास पाचभावे, वय २६ वर्ष, राहणार निंबोली याने पीडित मलास ब्रेड पकोडा खाण्याचा बहाण्याने स्व. गुल्हाने विद्यालयाच्या मुलीच्या मुत्रीघरात नेले व मुलावर लैंगिक अत्याचार केला.

सदर घटनेनंतर पीडीत मुलगा रडत रडत घरातून बाहेर आला त्यामळे आठवडी बाजारात उपस्थित नागरिकांनी मुलास विचारणा केली असता त्याने घडलेली घटना त्यांना सांगितली. उपस्थितांनी सदर बाब पिडीत मु लाच्या वडीलास सांगितली असता त्यांनी पो.स्टे. मंगरूळ दस्तगीर येथे दि.१२/०४/२०२५ रोजी घडलेल्या घटनेबाबत तक्रार दिली. प्राप्त तक्रारीवरून पो.स्टे. मंगरूळ दस्तगीर येथे दाखल गुन्हयाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी चांदुर रेल्वे अनिल पवार यांनी करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे ॲड. प्रशांत देशमुख यांनी सरकारी अभियोक्ता म्हणून काम पाहिले व पीडित मु लगा तसेच इतर १० साक्षीदार न्यायालया समक्ष तपासले पो.हवा. रोशन दुधे यांनी सदर प्रकरणी पैरवी अधिकारी म्हणून कामकाज पाहिले. संपरिक्षेअंती अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय क्रं. ०३, अमरावती यांनी दिनांक २०/०५/२०२६ रोजी आरोपीस २० वर्ष सश्रम कारावास व २५,००० रुपये दंड तसेच दंड न भरल्यास ०६ महिने कारावासाची शिक्षा सुनावली.

## उद्योजक चंद्रकुमार जाजोदिया यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी २२ मे



**अमरावती:** अमरावतीचे लोकप्रिय, मनमिळाऊ आणि साध्या स्वभावाचे समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया उर्फ लप्पीभैय्या यांच्या वाढदिवसानिमित्त एका कौटुंबिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

या विशेष प्रसंगी अनेक संत, समाजसेवक, प्रतिष्ठित नागरिक, तसेच मित्र आणि कुटुंबीय उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात विविध साधू , संत आशीर्वाद देतील आणि त्यांची स्तुती करतील. ते समाजसेवा, मूल्ये आणि लोककल्याण यावर प्रेरणादायी संदेशही देतील. आयोजन समितीने जाहीर केले आहे की, या निमित्ताने अमरावती शहरात विविध सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येईल. सर्व नागरिक, मित्र आणि हितचिंतकांना विनंती आहे की, त्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून आशीर्वाद द्यावेत आणि लप्पीभैय्या यांना त्यांची आजीवन सेवा चालू ठेवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. हॉटेल हरी गंगा द लेक ॲटिट्यूड, छत्री तालाब, अमरावती २२ मे रोजी संध्याकाळी ७ ते रात्री ११ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# कत्तली करीता आणलेल्या ११ गोवंशांना जीवदान

प्रतिनिधी २२ मे



**अमरावती :** कत्तली करीता आणलेल्या ११ गोवंश यांना जिवदान देऊन एक आरोपीस अटक करण्यात गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे. २१.०५.२०२६ रोजी पो. स्टे गाडगे नगर परिसरात पेट्रोलींग करीता असतांना गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारा कडुन माहीती प्राप्त झाली की, आझाद नगर अमरावती येथे शेख रियाज रा. आझाद नगर अमरावती नावाच्या इसमाने बकरी ईद सणा निमीत्ताने कुर्बानीच्या कत्तली करीता गोवंश जनावरे आणले असुन ते स्वतःच्या घरा समोरील एका टिनाच्या बंधिरत गोठ्यामध्ये डांबुन ठेवलेले आहे. अशा माहीती वरून गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी जावुन पाहणी केली असता एका टिन पत्राच्या शेडमध्ये गोवंश जनावरे डांबुन आखुड दोरीने बांधलेले दिसुन आले असता एकुण ११ लहान मोठ गो व गोवंश कि.अं. २,८०,०००/-रू. चे गो व

## ◆ एका आरोपीस अटक

गोवंश पंचासमक्ष ताब्यात घेवुन त्यांना सुरक्षित रखवाली व संगोपना करीता पशु वैद्यकीय अधिकारी, म.न.पा अमरावती यांचे हस्ते गौरक्षण संस्था दस्तुर नगर अमरावती येथे दाखल करण्यात आले असुन आरोपीतां विरूध्द प्राणि निर्दयतेने वागविण्याचा अधिनियमान्वये पो. स्टे गाडगे नगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ताब्यातील आरोपीतांचे नांव शेख रियाज शेख इलीयास वय २५ वर्ष रा. आझाद नगर अमरावती असे आहे.

ताब्यात घेतलेला मुद्देमाल ११ गोवंश कि.अं. २,८०,०००/- रू. एवढी आहे. वरिष्ठ पोलिस अधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई केली.

# स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात ४५३ मतदार, ७ मतदान केंद्र

प्रतिनिधी २२ मे

## ◆ विभागांनी समन्वयाने काम करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**अमरावती:** महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी सोमवार, दि. २५ मे रोजी अधिसुचना प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर १ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. या निवडणुकीसाठी जिल्ह्यात ४५३ मतदार असून उपविभागीय अधिकारी स्तरावर मतदान केंद्र राहणार आहे, निवडणुकीसाठी अल्प कालावधी असल्याने सर्व विभागांनी समन्वाने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणूक निमित्ताने जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे निवडणुकीशी संबंधित विभाग प्रमुखांची बैठक घेतली. बैठकीसाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दानेज, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी . येरेकर यांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी लागणारी आचारसंहिता जशीच्या तशी लागू करण्यात आली आहे. याची नोंद निवडणुकीशी संबंधितांनी घ्यावी. मतदान प्रक्रिया सुलभ होण्यासाठी उपविभागीय स्तरावर मतदान केंद्र राहणार आहे. मतदारांची ड्राफ्ट यादी तयार झाली असून सर्व राजकीय पक्षांना ती पाठविण्यात येईल. यावरील हरकतीनंतर मतदारयादी अंतिम करण्यात येणार आहे. आचारसंहितेसाठी जिल्हा आणि तालुकास्तरावर समिती नेमणे आवश्यक आहे. त्यानुसार कारवाई करण्यात यावी.

आचारसंहितेच्या कालावधीत कामे प्रस्तावित करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहे. त्यानुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती स्थापन करण्यात आली आहे. कामे प्रस्तावित करणे आवश्यक असल्यास या समितीकडे पाठविण्यात याव्यात. मतदार कमी असल्याने त्यांना प्रलोभन देण्याचे प्रकार होण्याची शक्यता असल्याने याबाबत काळजी घेण्याची सूचना जिल्हाधिकारी . येरेकर यांनी दिली.

# वाहन चोरी करणारा सराईत गुन्हेगार ताब्यात

प्रतिनिधी २२ मे



**अमरावती :** वाहन चोरी करणारा सराईत गुन्हेगार ताब्यात घेऊन त्याचे कडून ३ वाहन चोरीचे गुन्हे उघड केले, २,००,०००/- रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आयुक्तालय हददीतील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकिस आणणेबाबत आदेशीत केल्यावरुन गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात पथकातील पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे. पोलिस स्टेशन सिटी कोतवालीला दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल झाला. गुन्हयाचा तपास गुन्हे शाखेचे पथक करीत असताना २१/०५/२०२६ रोजी गुन्हे शाखेच्या पथकास माहिती मिळाली की एक इसम हा सुंदरलाल चौक ते अमरावती कोर्ट कडे चोरीची गाडी घेवून फिरत आहे. अशा माहीती वरून फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन समोरील रोडवर सापळा रचुन थांबलो असता एक इसम हा मोटर सायकलसह येताना दिसला त्यास पोस्टाफच्या मदतीने थांबवून त्यास त्याचे ताब्यातील सदर ग्रे रंगाची ॲक्टीवा गाडी नबंर एम.एच. २७ ए.क्यु. ३७०० मोटर सायकल बाबत विश्वासात घेउन बारकाईने विचारपुस केली असता त्याने ती मोटार सायकल अंदाजे पंधरा ते विस दिवसा पूर्वी धर्मदाय कॉटन फंड येथील पार्किंग मधून चोरी केल्याचे सांगितले. आरोपीला ताब्यात घेवून बारकाईने विचारपूस केली असता खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले. आरोपीचे नांव आकाश रविंद्र कंठाळे, वय २८ वर्ष, रा. आदर्श नगर, गोपाल नगर अमरावती आहे. गुन्ह्यातील चोरी गेलेले २,००,०००/- रू. चा मुद्देमाल जप्त केले.

# पिंपळोद येथे बोर्डी नदीवर पूल पांदण रस्त्यासाठी पालकमंत्र्यांना निवेदन सादर

प्रतिनिधी २२ मे

**दर्यापूर :** सामाजिक कार्यकर्ते श्री. बबन दादा पाटील पटांगे व युवा शेतकरी चि. कौस्तुभ पाटील घोम यांनी दिले निवेदन दिले.



पिंपळोद गावांतील अनेक वर्षापासुनचे पांदन रस्ते आणि नदीवरील पूल व स्मशानभूमी जाण्याकरिता आणि पिंपळोद ते कुटासा .पिंपळोद ते गायचारा, पिंपळोद ते अंतरगाव, पिंपळोद ते वडनेर रस्ता, व शेताला जोडणारे पांदन रस्ते जोडण्याबाबत या संबंधित दि /२४/२/२०२० शेतकऱ्यांनी उपोषण सुद्धा केले होते पिंपळोद गावातील ग्रामपंचायत कडून पाठपुरावा सुध्दा केला आजी,माजी सरपंच यांनी वारंवार निवेदन शासनाला दिले. काही रस्ते मंजूर झाले.

त्या रस्त्याचे तात्काळ काम चालू करा. परंतु जे शेताला जोडणारे पांदन रस्ते रखडलेले आहेत त्या रस्त्याला मंजुरी लवकरात लवकर देण्यात यावी. मुख्य म्हणजे पिंपळोद गावातील ७० टक्के टक्के शेती हि नदींपलीकडे असून पावसाळ्यमध्ये नदी ओलांडून जाने येणे करावे लागते. अक्षरशहा पावसाळ्याचे चार महिने शेतामध्ये जाने व काम करणे दिवसेंदिवस कठीण होत चाललेले आहे शेतकरी आणि मजूर व गुरे ढोरे यांना नदी ओलांडताना आणि रस्त्यांनी जाताना आपला जीव मुठीत घेऊन जावे लागते. तरी यावर्षी कित्येक जनावरे नदीत मरण पावले. नदीला २५ ते ३० फुट. खोल पाणी राहते. व जाण्यास फार काठीण काम होते.

त्यासाठी बोर्डी नदीवर पूल मंजूर करावा.

पिंपळोद ते कुटासा पांदन रस्ता ७९० मीटर मंजूर झाला . परंतु कुटासा गावापर्यंत पूर्ण करा. रस्त्याचे तात्काळ काम चालू करण्यात यावे अशी मागणी पिंपळोद गावातील सामाजिक कार्यकर्ते बबन दादा पाटील पटांगे. युवा शेतकरी कौस्तुभ पाटील घोम यांनी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदन सादर केले.

## दारू पिण्यासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल गुन्हे दाखल



प्रतिनिधी २२ मे

**अमरावती :** अमरावती शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत गुन्हे शाखेच्या पथकाने पोस्टे फ्रेजरपुरा हद्दीतील आदित्य वाईन शॉप च्या बाजूला आहान अंडा सेंटर व स्नॅक्स सेंटर व जय गजानन सोडा व स्नॅक्स सेंटर चे मालक अमोल मोतीराम डाके, सोपान लक्ष्मण दुर्गे, करण सुदर्शन , आकाश राय सर्व राहणार अमरावती हे लोकांना दारू पिण्याची जागा उपलब्ध करून देत होते. त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध पोस्टे फ्रेजरपुरा येथे कलम ६८ महाराष्ट्र दारूबंदी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा २७ मेपासून

प्रतिनिधी २२ मे

## ◆ एआय-आधारित सीसीटीव्ही निगराणीखाली परीक्षा प्रक्रिया

**अमरावती:** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकच्या उन्हाळी मे-जून २०२६ परीक्षांना २७ मेपासून प्रारंभ होत असून अमरावती विभागांतर्गत एकूण ८४ परीक्षा केंद्रांची निश्चिती करण्यात आली आहे. परीक्षा शिस्तबद्ध, पारदर्शक व कॉपीमुक्त वातावरणात पार पडाव्यात यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडून यंदा अनेक महत्त्वपूर्ण आणि कठोर उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

कुलगुरू डॉ. राजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन, परीक्षा नियंत्रक बटूप्रसाद पाटील तसेच विभागीय संचालक डॉ. जयंत वडते यांच्या सहकार्याने परीक्षा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे.

यंदाच्या परीक्षेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे सर्व परीक्षा केंद्रांवर प्रथमच एआय-आधारित सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय. या यंत्रणेचे नियंत्रण परीक्षा विभाग, नाशिक तसेच विभागीय केंद्रामार्फत ठेवण्यात येणार आहे. प्रश्नपत्रिका डाउनलोड करण्यापासून ते उत्तरपत्रिका सीलिंगपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया सीसीटीव्ही देखरेखीखाली राहणार असल्याने परीक्षा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येणार आहे. विद्यापीठाचा हा निर्णय सर्व स्तरांतून स्वागतार्ह मानला जात असून परीक्षा व्यवस्थापनात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याचा हा महत्त्वाचा प्रयत्न मानला जात आहे.

मागील जानेवारी-२०२६ हिवाळी परीक्षेदरम्यान काही संवेदनशील केंद्रांवर अमरावती विभागीय केंद्रामार्फत 'बैठे भरारी पथक' संकल्पना राबविण्यात आली होती. या उपक्रमाबाबत विद्यार्थी व पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. दरम्यान, मे-जून २०२६ परीक्षेसाठी भरारी पथकांमध्ये प्राचार्य दर्जाच्या अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला असून वरिष्ठ बहिस्थ पर्यवेक्षक म्हणून नीट सेट व पीएचडी पात्रता धारकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सर्व पर्यवेक्षक व पथक सदस्यांच्या स्वतंत्र बैठका घेऊन त्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. वरिष्ठ बहिस्थ पर्यवेक्षक व भरारी पथक सदस्यांच्या नियुक्त्यांना विद्यापीठाची पूर्वमान्यता घेण्यात आली असून परीक्षा आयोजनाची सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती अमरावती विभागाचे वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार यांनी दिली आहे. उन्हाळी मे-जून २०२६ परीक्षा नियमबद्ध, पारदर्शक, शिस्तबद्ध आणि विद्यार्थीकेंद्रित तणावमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व संबंधितांनी सहकार्य करावे, असे आवाहन विभागीय केंद्रामार्फत करण्यात आले आहे.

## शस्त्र बाळगणारा गुन्हेगार अटकेत




प्रतिनिधी २२ मे

**अमरावती :** २१ मे रोजी पोस्टे फ्रेजरपुरा हद्दीत रेकॉर्ड वरील आरोपी सचिन शामराव वानखेडे, वय ४३ वर्ष, रा.लायब्ररी चौक फ्रेझरपुरा, वैभव अजय बनसोड वय २६ वर्ष , रा.राहुल नगर, बिच्छू टेकडी अमरावती हे अवैधरित्या शस्त्र बाळगलेल्या स्थितीत मिळाल्याने गुन्हे शाखेच्या पथकाने दोघांवर स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत.

## पसंतीच्या दुचाकी क्रमांकासाठी सोमवारी अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २२ मे

**अमरावती:** प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे परिवहनेत्तर (दुचाकी) संवर्गातील वाहनांसाठी नवीन वाहन मालिका सुरू करण्यात येत आहे. या मालिकेतील आवडते किंवा पसंतीचे क्रमांक मिळवण्यासाठी इच्छुक वाहनधारकांनी सोमवार, दि. २५ मे रोजी अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.


प्रादेशिक परिवहन कार्यालयात २५ मे रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० वाजेपर्यंतच खिडकी क्रमांक २५ अर्ज स्वीकारले जातील. यासाठी वाहन ज्या व्यक्तीच्या नावावर आहे, त्या व्यक्तीच्या नावाचा अर्ज, पत्त्याचा पुरावा, पॅन कार्ड आणि आधार कार्डशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक अर्जावर नमूद करणे अनिवार्य आहे. पसंती क्रमांकाचे विहित शुल्क अमरावती कॅम्प ब्रँच, ट्रेझरी ब्रँच कोड नं. ००३८६६ करिता देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरणे आवश्यक आहे. ज्या पसंती क्रमांकासाठी एकच अर्ज असेल किंवा एकापेक्षा जास्त अर्ज आले असतील, अशा क्रमांकाची यादी २५ मे रोजीच सायंकाळी ४ वाजता कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावली जाईल. एकाच क्रमांकासाठी दोन किंवा अधिक अर्ज आले असल्यास २६ मे रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत मूळ शुल्काव्यतिरिक्त जादा रकमेचा डिमांड ड्राफ्ट बंद लिफाफ्यात खिडकी क्र. २५ वर जमा करावा लागणार आहे. दुपारी ३ वाजता प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या दालनात लिफाफे उघडले जातील. सर्वाधिक रकमेचा डिमांड ड्राफ्ट असलेल्याला पसंती क्रमांक दिला जाईल. उर्वरित अर्जदारांचे डीडी परत केले जातील, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी कळविले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि २२ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे -डॉ. अनिल कावरखे

**वाशीम :**कन्याभृणहत्या आणि बिघडते लिंग गुणोत्तर हा समाजासमोरील गंभीर प्रश्न असून, या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्हा प्रशासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि लिंग निवडीस प्रतिबंध घालण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी जर लिंग निदान प्रतिबंधक व गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी कायदा) किंवा वैद्यकीय गर्भपात अधिनियम (एमटीपी कायदा) अंतर्गत गर्भलिंग तपासणी करणाऱ्यांविषयी खात्रीशीर माहिती दिली.आणि त्या आधारे गुन्हा उघडकीस आला, तर संबंधित माहितीदारास रु. १ लाखांचे बक्षीस देण्यात येणार आहे.जिल्हा रुग्णालयात पीसीपीएनडीटी जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक पार पडली. जिल्हा रुग्णालयात पीसीपीएनडीटी जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हास्तरीय सल्लागार समिती अध्यक्षा डॉ. अलका मकासरे,जिल्हा शल्य चिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी डॉ. अनिल कावरखे , अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी,ॲड. डॉ .शिवनंदा आम्ले, डॉ.जया बिबेकर, डॉ.जे.एस.बाहेती,ॲड. गोवर्धन गंगावणे,डॉ.उज्वला गिऱ्हे,ॲड. राधा नरवलिया आदी उपस्थित होते.



शेतकऱ्यांची फसवणूक

### माणुसकी बईमान, नाही राहीले ईमान, पैसाच महान...

# कृत्रीम खत टंचाई, लूटण्याची घाई !

### *निकृष्ट खते व बियाण्यांची सर्रासपणे विक्री * बळीराजा पुन्हा अडचणीत येण्याची शक्यता

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात मे महिन्यातच पावसाच्या आगमनाने बळीराजा पेरणीच्या कामाला लागला आहे. खत बी-बियाणे खरेदी करण्याकरिता बाजारात गर्दी करीत आहे. बोगस बियाणे तथा बनावट रासायनिक खते माथी मारून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लुबाडणूक करणारी लुटारूंची टोळी पून्हा एकदा जिल्ह्यात सक्रीय झाली असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. मागील वर्षी अरिहंत कंपनीच्या बोगस सुपर फॉस्पेट खंताविरोधात कृषी विभागाकडे केलेल्या तक्रारीने ही बाब उजेडात आणली होती. यावेळेस कृषी विभागाने वेळेवर सजगपणा न दाखविल्यास शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. कृत्रीम खत टंचाई निर्माण करून डीएपी सोबत इतर बी-बियाणे व खते घेण्याचा आग्रह करीत आहे. त्या शिवाय बोगस बियाणेही जिल्ह्यात दाखल झाले असून कृषी केंद्राकडून त्याची विक्री होत असून शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. त्यामुळे कृषी विभाग तत्पर असला तरी लुटारू मात्र, सक्रीय आहेत. त्यामुळे कृत्रीम खत टंचाई दाखवून लूटण्याची घाई हे लूटारू करीत आहेत.



शेतकऱ्यांना खत दरवाढीचा फटका सोसावा लागू नये म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने खतांच्या अनुदानात भरीव वाढ केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना जुन्याच किंमतीत खते मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र काही कृषी सेवा केंद्रावर अद्यापही नवीन किंमतीनुसारच खतांची विक्री सुरू असल्याचे दिसून येत आहे. याबाबत केंद्र सरकार किंवा संबंधित कंपण्यांचे भाव कमी करण्या संदर्भातले पत्र प्राप्त न झाल्यामुळे नव्या दराने खत विक्री करण्यात येत असल्याचे कृषी सेवा केंद्र संचालकांचे मत आहे. कृषी विभागाने याबाबत पुढाकार घेवून शेतकऱ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबवावी अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

यावर्षी मे महिन्यातच पाऊस कोसळल्याने बळीराजामध्ये आनंदाचे वातावरण आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी आता शेतीच्या कामाला लागला असून चांगला पाऊस पडण्याचे संकेत दिल्याने बि-बियाण्याच्या खरेदीला सुरूवात केली आहे. त्यामुळे आजमिती शेतकऱ्यांची मशागतीसोबतच खते व बियाणे खरेदी करण्याची लगबगही सुरू झाली आहे. नेमका याच लगबगीचा फायदा घेत बाजारात शेतकऱ्यांना लुटण्यासाठी काही लुटारुंची टोळी सक्रीय झाली आहे. अधिक पैसा कमविण्याच्या हव्यासातून सदर लुटारू बोगस बियाणे किंवा खते शेतकऱ्यांच्या माथी मारून त्यांची आर्थिक पिळवणूक करण्याचा गोरखधंदा या लुटारुंकडून सुरू असते. टिएल कंपनीच्या बोगस सोयाबीन बियाणे सुपर फॉस्फेट विक्रीतून हा बोगसपणा पून्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. सदर कंपनीच्या मिश्र खतांचे नमुने गुणवत्ता तपासणीत निकृष्ठ असल्याचे समोर आले असतानाही त्याची विक्री सर्रास सुरू आहे.

तर शेतकऱ्यांच्या फसवणुकीसाठी डीएपी खातासोबत नॅनो व सल्फर खाताची लिंकींग सुरू असून ती थांबविण्याची मागणी शिवसेना शहर प्रमुख डॉ. विशाल सोमटकर यांनी केली आहे. केंद्र सरकारच्या अनुदानानंतर खतांच्या किमती कमी झाल्या असतानाही काही दुकानदार वाढीव किमतीतच विक्री करीत आहेत. कृषी विभागाने हा सर्व प्रकार थाबविणे गरजेचे आहे.

#### कोरोमंडल व अक्षय अदित्य कंपनीने केली होती लूट

रासायनीक खताबरोबर लिंकींग असलेली कोरोमंडल या कंपनीकडून शेतकऱ्यांची लूट झाल्याच्या तक्रारी गेल्या वर्षी केल्या होत्या . शिवाय अक्षय अदित्य कंपनीचे टिएल सोयाबीन बियाणे ही बोगस असल्यामुळे यांच्याही तक्रारी झाल्या होत्या. त्यामुळे तक्रारीनंतरही काही कृषी सेवा केंद्रातून याची विक्री सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक करून लूट करण्याच्या तयारीला काही कृषी सेवा केंद्रावाले लागले आहेत.




५ गुरूवार दि.२१ मे २०२५ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express

शेतकऱ्यांची फसवणूक सावधान...शेतकऱ्यांचे लुटारू सक्रीय !

*निकृष्ट खते व बियाण्यांची सर्रासपणे विक्री * बळीराजा पुन्हा अडचणीत येण्याची शक्यता * प्रशासनाने वेळीच दखल घ्यावी

#### चार वर्षीच्या तक्रारीवर कारवाई नाही

कोरोनाच्या संकटात मागील चार वर्षापूर्वी बोगस बियाण्यातून शेतकऱ्यांची मोठी फसवणूक झाली होती. दुबार-तिबार पेरणीनंतरही शेतकऱ्यांनी पेरलेले बियाणे उगवलेच नाही. त्यामुळे निराश झालेल्या शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तब्बल ५ हजार तक्रारी केल्या मात्र, कंपण्या व कृषी सेवा केंद्राच्या हातातील बाहूली झालेल्या कृषी विभागाला यामध्ये काही गांभिर्य दिसले नाही. चार वर्ष लोटले तरी या तक्रारींवर काहीच कारवाई झाली नाही ही वस्तूस्थिती आहे. बोगस बियाण्यांमधून झालेली आर्थिक हानी भरून निघावी यासाठी शेतकऱ्यांना मदतीची आस होती परंतु, त्यांचा भ्रमनिरास झाला.



---

### थोडक्यात

## जि.प.विद्यालय कामरगाव येथे ‘शून्य सावली दिवस’ साजरा



●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

‘आपली सावली कायम आपल्यासोबत असते...’ असे आपण नेहमी म्हणतो मात्र वर्षातून दोन वेळा असा एक क्षण येतो, जेव्हा ही सावली जणू गायबच होते. या अद्भुत भौगोलिक आणि वैज्ञानिक घटनेचा अनुभव विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगातून देण्यासाठी पीएमश्री जिल्हा परिषद विद्यालय, कामरगाव येथे ‘शून्य सावली दिवस’ उत्साहात साजरा करण्यात आला.

२० मे रोजी जिल्हा परिषद विद्यालयाच्या प्रांगणात शाळेचे मुख्याध्यापक प्रा. सुरेश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमप्रमुख गोपाल खाडे, नीता तोडकर व दिपाली खोडके यांनी विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयोगांचे आयोजन केले. विद्यार्थ्यांनी काचेवर तसेच जमिनीवर विविध वस्तू ठेवून त्यांच्या सावल्यांचे निरीक्षण केले. विज्ञान पुस्तकापुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष अनुभवातून समजावून सांगितल्यास विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाविषयी आकर्षण निर्माण होते, तसेच अंधश्रद्धेपेक्षा वैज्ञानिक विचार करण्याची सवय लागते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. उन्हाळ्याच्या दिवसाचे वैज्ञानिक आणि भौगोलिक घटनेचा आनंद घेण्याकरता विद्यार्थी शाळेत उपस्थित होते. या उपक्रमात नारायण एकनार, प्रशांत वार्डेकर, मंगला बोन्द्रे, आरुषी भुजाडे, जानवी देशमुख, राधा निंघोट, समीक्षा जोगी, कृष्णाई गाढवे, पायल माहूरकर, खुशी भजभुजे, गौरी शिंदे, पूर्वी ठाकरे, प्रिया सोनवाने, पूर्वी डुकरे, आराध्या गायधने, धनश्री बावणे, आदित्य देशमुख, अर्पिता पांडुळे, वैष्णवी धुमाळे आदी विद्यार्थिनी उत्साहाने सहभागी झाल्या. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून ‘सावली गायब होण्यामागील विज्ञान’ समजावून घेतले आणि हा दिवस त्यांच्या दृष्टीने संस्मरणीय ठरला असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरता शिक्षक वृंद विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

---

# घोटा परिसरात रोहयोला ब्रेक, मजुरांवर भटकंतीची वेळ !

## कामाचे दिवस वाढले कागदावर, प्रत्यक्ष जमिनीवर मात्र शुकशुकाट...

● दिपक मापारी @ रिसोड●

दरवर्षी ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला हक्काचा रोजगार मिळवून देणाऱ्या रोजगार हमी योजनेला यंदा घोटा परिसरात जणू ब्रेक लागला आहे. शासनाने यंदा वर्षी मजुरांना १०० दिवसांऐवजी १२५ दिवस कामाची हमी देण्याची मोठी घोषणा केली खरी, मात्र प्रत्यक्षात घोटा परिसरातील अनेक गावांमध्ये अद्याप काहीही कामाचा नारळ फुटलेला नाही. त्यामुळे हाताला काम नाही आणि खिशात पैसा नाही अशी परिस्थिती निर्माण झाली असून, पोटाची खळगी भरण्यासाठी मजुरांना काळ्याच्या उन्हात इतरत्र भटकंती करावी लागत आहे.

रिसोड तालुक्यातील घोटा परिसरातील अनेक गावांमध्ये दरवर्षी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू केली जात असत. गावाच्या गरजेनुसार कोणत्या गावात दोन महिने, तर कोणत्या गावात महिना किंवा १५ दिवसांचे काम अविरत चालत. स्थानिक मजुरांच्या हाताला गावातच काम मिळत असल्याने मजूर वर्ग आनंदात असायचा. या हक्काच्या पैशामुळे ग्रामीण भागातील



अर्थचक्रालाही मोठी गती मिळत होती. मात्र यंदा चित्र उलटे दिसत आहे. यंदा शासनाने रोहयो अंतर्गत कामाचे दिवस १०० वरून १२५ दिवस करण्याची घोषणा केल्यामुळे मजुरांमध्ये आनंदाचे वातावरण होते. जास्त दिवस काम मिळेल आणि कुटुंब सुखाने चालेल, अशी आशा होती. मात्र, प्रशासनाची अनास्था आणि नियोजनाचा अभाव यामुळे यंदाच्या हंगामात बहुतांश गावांमध्ये अद्याप एक दिवसाचीही काम सुरू झालेले नाही. कागदावर वाढलेले कामाचे दिवस प्रत्यक्ष जमिनीवर कुठेच दिसत नसल्याने मजुरांचे पुरता भ्रमनिरास झाला आहे. कामे पूर्णपणे ठप्प असल्यामुळे मजुरांवर आता कुटुंबाचे पालनपोषण कसे करावे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. कडाक्याच्या उन्हात काम शोधत फिरण्याशिवाय मजुरांकडे पर्याय उरलेला नाही. ग्रामीण भागातील ही बेरोजगारी अशीच राहिली, तर मजुरांवर उपासमारीची वेळ येईल अशी भीती व्यक्त होत आहे. दरवर्षी वेळेत सुरू होणारी कामे यंदा नेमकी का रखडली? ग्रामपंचायतीकडून कामांचे योग्य नियोजन करण्यात आले नाही, की प्रशासकीय मंजुरीच्या लाल फितीत ही कामे अडकली आहेत? असा सवाल सुजाण नागरिक उपस्थित करत आहेत. कारण काहीही असले, तरी याच्याहोणाऱ्या फटका मात्र गरीब मजुरांना बसत आहे. परिसरातील वाढती बेरोजगारी आणि मजुरांची होणारी ससेहोलपट थांबवण्यासाठी प्रशासनाने या गंभीर बाबीकडे दखल घेऊन त्वरित घोटा परिसरातील गावांमध्ये रोजगार हमी योजनेची कामे सुरू करावी अशी मागणी मजुरांनी केली आहे.

---

## कारंजा शहर व तालुक्यात बोगस (बंगाली) डॉक्टर पुन्हा सक्रिय

**तालुका आरोग्य अधिकाऱ्याचे चौकशीचे आदेश**

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

कारंजा शहर व तालुक्यात पुन्हा बोगस (बंगाली) डॉक्टर सक्रिय झाले असून मोठ्या प्रमाणावर अवैध वैद्यकीय व्यवसाय करीत आहे. त्यांच्याजवळ कोणत्याही प्रकारची वैद्यकीय डिग्री नसून ते राजरोसपणे रुग्णाच्या जीवाशी खेळत आहे. त्यामुळे अशा डॉक्टरांवर फौजदारी गुन्हे दाखल होऊन अटक होणे गरजेचे आहे. याच संदर्भात तालुका आरोग्य अधिकारी यांनी चौकशीचे आदेश दिले असून अशा बोगस डॉक्टरवर आता कारवाई होणार आहे.

सविस्तर माहिती अशी की, मौजे वढवी, बेलखेड, धामणी, मनभा, सोहळ, शेलुबाडा, धोत्रा जहाँ, लोहारा, झोडगा या गावात खाजगी वैद्यकिय व्यवसायीक (बंगाली डॉक्टर) व्यवसाय करीत असल्याचे, ग्रामीण भागात तथाकथित बंगाली डॉक्टरांनी मोठया प्रमाणात आपले बस्तान मांडल्याचे चित्र समोर येत आहे. अशाप्रकारे वृत्तपत्रामध्ये तक्रार नमुद केली आहे. तरी सदर गाव आपल्या कार्यक्षेत्रामध्ये येत असल्याने, आपण स्वतः सदर गावामध्ये भेट देवून संबंधितांचे शैक्षणीक कागदपत्रांची पडताळणी करुन आपला अहवाल आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करण्यात यावा.

तसेच ग्राम पंचायत स्तरावरुन अशा व्यक्तींना खाजगी वैद्यकिय व्यवसाय करणेबाबत परवानगी देण्यात आलेली आहे काय याबाबत सरपंचा व सचिव ग्राम पंचायत वढवी, बेलखेड, धामणी, मनभा, सोहळ, शेलुवाडा, धोत्रा, लोहारा, झोडगा यांनी या कार्यालयास अहवाल सादर करण्याचे सांगितले आहे.

---

### नागपुरात ‘मिसिंग’ वेदांत सुखरूप सापडला;

## हुडकेश्वर पोलिसांची अवघ्या दोन तासांत कारवाई !

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

वाशीम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुक्यातून अपहृत झालेला १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा नागपूर येथे सुखरूप आढळून आला असून, हुडकेश्वर पोलिसांनी अवघ्या दोन तासांत केलेल्या तत्पर कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला आहे. या कारवाईमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पोलीस ठाणे मंगरूळपीर येथे दिनांक २१ मे २०२६ रोजी अप. क्र. ४०४/२६ कलम १३७(२) ँन्ए अंतर्गत वेदांत विलास गायकवाड (वय



१७ वर्षे, रा. कोठारी ता. मंगरूळपीर जि. वाशिम) हा घरून निघून गेल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. मुलाचे वडील विलास माणिक गायकवाड यांनी अज्ञात आरोपीविरुद्ध तक्रार दिली होती. दरम्यान, मुलाच्या मोबाईलचे लोकेशन नागपूर येथे आढळून आल्यानंतर मुलाचे वडील, पत्रकार दिलीप अवगण पाटील व नातेवाईक तातडीने नागपूरला रवाना झाले. त्यांनी हुडकेश्वर पोलीस ठाण्यात धाव घेत मुलाचा शोध घेण्याची विनंती केली. यावर पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेंद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली मिसिंग पथकाचे ASI दीपक मोरे यांनी तात्काळ हालचाली सुरू केल्या. पोलिसांनी मोबाईल लोकेशन ट्रेस करून संशयित परिसरात शोधमोहीम राबविली.

तपासादरम्यान वेदांत हा नागपूर शहरातील सीताबर्डी पोलीस ठाणे हद्दीतील मोदी नंबर ३ परिसरात सुखरूप अवस्थेत आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी मुलाला सुरक्षितपणे त्याच्या वडील व नातेवाईकांच्या ताब्यात दिले. या घटनेची माहिती मंगरूळपीर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शेळके यांना देण्यात आली असून, हुडकेश्वर पोलिसांच्या जलद आणि संवेदनशील कारवाईबद्दल नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

# चोरीचा डाव फसला; रिसोड पोलिसांचा तपास भारी ठरला !

### *रिसोड पोलिसांची तत्परता आणि विशेष कामगिरी *चोरी गेलेला ६,१२,८००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

रिसोड बसस्थानक परिसरात चोरी गेलेल्या तब्बल ६ लाख १२ हजार ८०० रुपयांच्या मुद्देमालाचा अवघ्या काही तासांत शोध घेत रिसोड पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या कारवाईमुळे वृद्ध महिलेला न्याय मिळाला असून पोलिसांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी सुनंदा बळीराम धांडे (वय ५९, रा. कमलानगर, ता. शहापूर, जि. ठाणे) या आपल्या नातेवाईकांकडे रिसोड येथे आल्या होत्या. दि. २० मे २०२६ रोजी त्या ठाणे जिल्ह्यात परत जाण्यासाठी रिसोड बसस्थानकावर दुपारी सुमारे १२ वाजता आल्या होत्या. काही वेळानंतर त्यांनी आपली पर्स तपासली असता त्यामधील एक लहान पर्स गायब असल्याचे लक्षात आले. त्या पर्समध्ये सोन्याची पोत, दोन कर्णफुले, एक अंगठी, मोबाईल फोन



तसेच २,८०० रुपये रोख रक्कम असा एकूण अंदाजे ६,१२,८०० रुपयांचा ऐवज होता. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी तात्काळ पथक तयार करून बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे आदेश दिले. तसेच सायबर शाखेच्या मदतीने मोबाईल लोकेशन आणि तांत्रिक तपास सुरू करण्यात आला. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी हिंगोली जिल्ह्यातील शेनगाव परिसरात शोधमोहीम राबवली. शेनगाव ते खिल्लार मार्गावरील खाजगी प्रवासी वाहनांची तपासणी सुरू असताना एका महिलेकडे संशय आल्याने तिची चौकशी करण्यात आली.

संबंधित महिलेने आपले नाव वत्सला दगडू तुरुकमाने (वय ६०, रा. काहकर, ता. शेनगाव, जि. हिंगोली) असे सांगितले. महिला पोलिसांमार्फत तिची तपासणी केली असता चोरीस गेलेली पर्स आणि त्यातील सोन्याची पोत, अंगठी, कानातील झुंबर, मोबाईल फोन तसेच रोख रक्कम असा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई यशस्वी झाल्यानंतर वृद्ध फिर्यादी महिलेच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

त्यांनी तसेच त्यांच्या नातेवाईकांनी वाशिम पोलीस दलाचे आभार मानत, ‘रिसोड पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तत्काळ कारवाई करत आम्हाला न्याय दिला,’ अशा भावना व्यक्त केल्या. सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री निकेश खाटमोडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड, सहायक पोलीस अधीक्षक श्री नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण, पोउपनि सचिन गोखले, पोउपनि रामेश्वर नागरे, पोहेका प्रशांत राजगुरू, पोकॉ विनोद घनवट, रवी अडागळे, हेमंत सरकटे, निवोद मस्के, परमेश्वर भोणे, महिला पोलीस कर्मचारी वृषाली ढगे, सुषमा गायकवाड तसेच सायबर पोलीस स्टेशनचे किशोर इंगोले यांनी पार पाडली.

---

## जिल्ह्यात ७ लाख १२ हजार लिटर इंधनाचा मुबलक साठा दाखल

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा होणार असल्याच्या पसरत असलेल्या अफवांना जिल्हा प्रशासनाने पूर्णपणे पूर्णविराम दिला आहे.

जिल्ह्यात इंधनाचा कोणताही तुटवडा नसून सर्व पेट्रोल पंपांवर डिझेल आणि पेट्रोल मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. आज दि. २० मे रोजी जिल्ह्याला विविध प्रमुख ऑईल कंपन्यांकडून एकूण ७,१२,५५० लिटर इंधनाचा मोठा साठा प्राप्त झाला आहे. यामध्ये ३,१९,५५० लिटर पेट्रोल आणि ङङ३,९३,००० लिटर डिझेलचा समावेश आहे. हा साठा अतिशय पुरेसा असून, यापुढेही दररोज नियमितपणे जिल्ह्याला इंधनाचा पुरवठा केला जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून घाबरून जाण्याचे किंवा अतिरिक्त साठा खरेदी करण्याचे कोणतेही कारण नाही, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. कंपन्यांकडून मिळालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, IOCL कंपनीकडून १,२६,५०० लिटर पेट्रोल व १,४२,५०० लिटर डिझेल, ङङप्झण्थ्ङङ कंपनीकडून ९१,००० लिटर पेट्रोल व ८०,००० लिटर डिझेल, तर BPCL कंपनीकडून ४८,०५० लिटर पेट्रोल व ८८,५०० लिटर डिझेलचा पुरवठा झाला आहे. यासोबतच खाजगी क्षेत्रातील नायरा कंपनीकडून ३०,००० लिटर पेट्रोल व ३२,००० लिटर डिझेल तसेच जिओ कंपनीकडून २४,००० लिटर पेट्रोल व ५०,००० लिटर डिझेलचा साठा जिल्ह्याला मिळाला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

शुकवार, दि. २२ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अफवांनी पेटविली रांगांची आग; प्रशासनाचा 'इंधन मुबलक'चा दावा

**बुलढाणा :** जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल टंचाईच्या चर्चांनी गेल्या काही दिवसांत अचानक वेग घेतल्याने पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र निर्माण झाले आहे; मात्र जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून, पुरवठा साखळी सुरळीत असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करावे, असे आवाहन पालकमंत्री मकरंद पाटील यांनी केले. प्रत्यक्षात जिल्ह्यातील अनेक भागांत 'टंचाई होणार' या चर्चेमुळे नागरिकांकडून अतिरिक्त इंधन साठवण्याकडे कल वाढल्याचे दिसून आले. परिणामी काही पेट्रोल पंपांवर अचानक दबाव निर्माण झाला. खरीप हंगाम तोंडावर असताना शेतकरी वर्गाची डिझेलवरील वाढती गरज आणि सर्वसामान्यांकडून सुरू झालेली घाईगडबडीची खरेदी यामुळे परिस्थिती अधिक तणावपूर्ण झाल्याचे चित्र आहे. जिल्हा प्रशासनाने मात्र परिस्थिती नियंत्रणात असल्याचा दावा केला आहे. प्रशासन ऑईल कंपन्या आणि पेट्रोल पंप चालकांच्या सतत संपर्कात असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांनाही सूचना देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# बांधकाम कामगारांवर अन्याय झाल्यास तीव्र आंदोलन

## शिवसेनेचा जिल्हा कामगार अधिकाऱ्यांना घेराव!

प्रतिनिधी २२ मे

**खामगाव:** बांधकाम कामगार योजनेमध्ये खऱ्या आणि गरजू लाभार्थ्यांना डावलून फक्त विशिष्ट राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना आणि चुकीच्या लोकांना लाभ दिला जात असल्याचा गंभीर आरोप करत शिवसेनेने जिल्हा कामगार अधिकाऱ्यांना घेराव घातला. शिवसेना जिल्हाप्रमुख ङ्ङसंतोष डिवरे यांच्या नेतृत्वाखाली २० मे २०२६ रोजी जिल्हा सहकारी कामगार अधिकारी कार्यालयावर हा धडक मोर्चा नेण्यात आला होता. यावेळी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत प्रशासकीय अनागोंदी कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला.



शिवसेनेने आंदोलनादरम्यान अधिकाऱ्यांसमोर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. संपूर्ण महाराष्ट्रात बांधकाम कामगार मंडळ, मुंबई यांची अधिकृत साईट बंद असताना, केवळ खामगावमध्येच कामगार मंडळाची साईट कशी काय सुरू आहे? असा रोखठोक सवाल उपस्थित करण्यात आला. ठराविक अधिकारी आणि नेत्यांच्या जवळच्या कार्यकर्त्यांनाच या योजनेचा फायदा मिळवून दिला जात असून, इतर पक्षांशी संबंधित किंवा सामान्य कुटुंबातील खरा लाभार्थी मात्र योजनेपासून वंचित आहे.तसेच, सामान्य नागरिकांनी वारंवार ऑनलाईन अर्ज करूनही त्रुटी काढून ते नामंजूर केले जातात. मात्र, एजंटच्या माध्यमातून आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांना 'चिरिमिरी' (लाच) दिल्यास कामे तात्काळ होतात. जुन्या लाभार्थ्यांचे स्कॉलरशिप आणि हॉस्पिटलचे बिल मंजूर करण्यासाठीही पैशांची देवाणघेवाण होत असल्याचा खळबळजनक आरोप शिवसेनेने केला आहे. सर्वसामान्य कामगारांसाठी असलेल्या जाचक अटी तातडीने शिथिल करण्यात याव्यात.ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी कामगार मंडळाची साईट २४ तास खुली ठेवण्यात यावी.कार्यालयातील एजंटगिरी आणि लाचखोरी तात्काळ बंद करून पारदर्शक कारभार करावा. बुलढाणा जिल्हा ऑफिस अंतर्गत होणारी कामगार नोंदणी लवकरात लवकर पूर्ववत सुरू करावी.

या आंदोलनात शिवसेना नेते अमोल अंधारे, खामगाव तालुकाप्रमुख राजेंद्र बघे, शेगाव तालुकाप्रमुख रामा पाटील थारकर, बांधकाम कामगार विदर्भ प्रमुख सचिन विटे, बांधकाम कामगार जिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर पाटील फरफट, पिंटू पाटील धोरण, उपतालुकाप्रमुख मंगेश काळे, परमेश्वर घोरपडे (जिल्हा उपप्रमुख, बां.का.सेना), शुभम वावरे (जिल्हा सचिव, बां.का.सेना), मंगेश वानखडे (तालुकाप्रमुख, बां.का.सेना), संतोष पवार (शेगाव तालुकाप्रमुख, बां.का.सेना) यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसेना पदाधिकारी आणि संतप्त बांधकाम कामगार उपस्थित होते.

> योजना ही सरकारची आहे, एखाद्या राजकीय पक्षाची घरची मालमत्ता नाही. जर प्रशासनाने एजंटगिरी बंद केली नाही आणि खऱ्या लाभार्थ्यांना न्याय दिला नाही, तर सर्व वंचित कामगारांना सोबत घेऊन कामगार मंडळाचे अध्यक्ष, सचिव आणि जिल्हा कार्यालयाविरुद्ध तीव्र मोर्चा व ठिय्या आंदोलन छेडण्यात येईल.
>
> **– संतोष डिवरे**
> (जिल्हाप्रमुख, शिवसेना)

# मलकापुरात पेट्रोलपंपावर 'मेलोडी चॉकलेट' वाटून शिवसेना (उबाठा) कडून मोदी सरकारचा निषेध

प्रतिनिधी २२ मे

**मलकापुर:** महाराष्ट्रात पेट्रोल, डिझेल व गॅसची भीषण टंचाई असून ४५ डिग्रीच्या भर उन्हाळ्यात नागरिकांना, शेतकऱ्यांना, ट्रॅक्टर धारकांना पेट्रोल आणि डिझेल साठी उन्हातान्हात लाईन मध्ये उभे राहावे लागत आहे,तर दुसरीकडे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी विदेशात फिरून ठमेलोडी चॉकलेट ठवाटप करीत आहे.मोदी सरकारचा निषेध म्हणून शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांच्या नेतृत्वात पेट्रोलपंप मेलोडी चॉकलेट वाटप करण्यात आले.



मलकापूर शहरात एकूण सहा पेट्रोल पंप असून यातील पाच पेट्रोल पंप आज बंद असल्याने नांदुरा रोडवरील नायरा पेट्रोल पंपावर वाहनधारकांनी पेट्रोल व डिझेल साठी एकच गर्दी केली होती.लोकांना पेट्रोल , डिझेल, गॅस साठी उन्हातान्हात उभं करून विदेशात फिरणाऱ्या मोदी सरकारचा जाहीर निषेध करीत शिवसेना (उबाठा)च्या पदाधिकाऱ्यांनी नायरा पेट्रोल पंपावर जाऊन उपस्थित वाहनधारकांना ठमेलोडी चॉकलेटठ वाटप करून मोदी सरकारचा जाहीर निषेध केला. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शिवसेना शहर प्रमुख हरीदास गणबास, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना उपशहर प्रमुख बाळू पोलाखरे, नगरसेवक रफिकभाई बर्तन वाले, माजी उपनगराध्यक्ष महादेव वनारे,नितीन गोसावी,वाहतूक सेना शहर प्रमुख इम्रान लकी, शाखाप्रमुख हसन गौरी, अनंता तायडे, संतोष राजपूत, शरद खराटे आदिंची उपस्थिती होती.

# खामगावात ७ बैलांची पोलिसांकडून सुटका

## दोन आरोपी ताब्यात: चार लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २२ मे

**खामगाव:** कत्तलीसाठी अमानूष पद्धतीने वाहतूक करण्यात येत असलेल्या ७ बैलांची खामगाव शहर पोलिसांनी २० मे रोजी धाडसी कारवाई करत सुटका केली. या कारवाईदरम्यान दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, वाहनासह जनावरे व अन्य साहित्य असा सुमारे ४ लाख १२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिस स्टेशन खामगाव शहर येथील अधिकारी व अंमलदार वाहतूक नियमन करत असताना गुप्त बातमीदारांकडून माहिती मिळाली की, एमएच ४७ क्यू ५९२८ या वाहनातून बुलढाणा मार्गाने खामगावकडे येत असून, त्यामध्ये कत्तलीसाठी जनावरांची वाहतूक केली जात आहे. माहितीच्या आधारे बाळापूर नाका येथे नाकाबंदी करून संबंधित वाहन थांबवण्यात आले वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ७ बैल दाटीवाटीने भरलेले



आढळले. जनावरांना हालचालीसाठी पुरेशी जागा नव्हती तसेच चारा व पाण्याची कोणतीही व्यवस्था केलेली नव्हती. जनावरांची वेदनादायक अवस्थेत वाहतूक सुरू असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी शफिक मुसा शेख (३४) व शेख महंमद शेख गफार (४८, दोघेही रा. पिंपळदरी पोस्ट बाळापूर, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर) यांना ताब्यात घेण्यात आले.

याप्रकरणी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारित २०१५) कलम ५ (अ), ९ तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० कलम ११ (१)(घ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक नीलेश तांबे, अपर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक आर. एन. पवार, पोउपनि. अमोल पाटे, पोहेकॉ. मनोहर गोरे, पोहेकॉ. शेख जावेद, पोकों. राम धामोडे, पोकॉ. जावेद शेख, पोकॉ. विजय सोनुने, पोकॉ. अमरदिपसिंह ठाकुर पोलिस स्टेशन. खामगाव शहर व खामगाव शहर पोलिसांच्या पथकाने केली.

# पाणीटंचाई व स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर

## काँग्रेस व राष्ट्रवादी अजितदादा गटाचे पदाधिकारी आक्रमक

प्रतिनिधी २२ मे

**चिखली:** शहरातील विस्कळीत पाणीपुरवठा, वाढती पाणीटंचाई आणि ढासळलेल्या स्वच्छता व्यवस्थेविरोधात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) नगरसेवकांनी नगर परिषद प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेत निवेदन सादर केले. प्रशासनाने तात्काळ उपाययोजना न केल्यास नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा विरोधी नगरसेवकांनी दिला आहे. निवेदनात काँग्रेस व राष्ट्रवादी (अजितदादा गट) नगरसेवकांनी आरोप केला आहे की, शहरात सुरू असलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम संबंधित कंत्राटदाराकडून निष्काळजीपणे करण्यात येत आहे. त्यामुळे जुन्या पाईपलाईनद्वारे होणारा पाणीपुरवठा



पूर्णपणे विस्कळीत झाला असून काही भागात ८ दिवसांनी तर काही भागात तब्बल २० दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे. यामुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच शहरातील कचरा व्यवस्थापन पूर्णपणे कोलमडल्याचा आरोपही करण्यात आला. अनेक कचरा गाड्या नादुरुस्त असून सफाई कर्मचारी केवळ कागदोपत्री काम करत असल्याचे नगरसेवकांनी म्हटले आहे. अनेक गाड्यांवर सहाय्यक कर्मचारी नसल्याने नियमित कचरा संकलन होत नसल्याचा आरोप करण्यात आला. नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्याने आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शहरातील मूलभूत प्रश्नांबाबत प्रशासन उदासीन असल्याचा आरोप करत तातडीने योग्य निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

या निवेदनावर प्राचार्य डॉ. निलेश गावंडे, डॉ. मो. इसरार, प्रा. मिनलताई गावंडे, उबेद अली खान, आनंद बोंद्रे, संध्या आनंद बोंद्रे, अमोल लहाने, गोकुळ शिंगणे, संतोष देशमुख, रत्नदीप यशवंत शिनगारे, गोपाल देव्हडे, प्रशांत भटकर, सुप्रिया प्रशांत भटकर, पी. एस. वायाळ, डॉ. प्रकाश शिंगणे, सीमा गोपाल देव्हडे, समीर जकाऊल्ला, स्वाती अमोल लहाने, सुनिता प्रकाश शिंगणे, शीतल संतोष देशमुख, मोहम्मद आसिफ आदी नगरसेवकांच्या सह्या आहेत. दरम्यान, प्राचार्य डॉ. निलेश गावंडे यांनी नगर परिषद प्रशासनावर टीका करत गेल्या सहा महिन्यांपासून पाणीपुरवठा, स्वच्छता आणि आरोग्याशी संबंधित प्रश्न सोडविण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप केला. 'चिखलीकरांच्या कराचा पैसा विधायक कामांसाठी खर्च झाला पाहिजे. आम्ही जनतेच्या समस्यांसाठी सातत्याने लढत राहू,' असे त्यांनी सांगितले.

# खत विक्रीतील गैरप्रकारांवर कृषी विभागाची नजर

## शेतकऱ्यांची फसवणूक केल्यास परवाना रद्द

प्रतिनिधी २२ मे

**खामगाव :** मेहकर येथील 'अजंठा ॲग्रो सर्व्हिसेस' प्रकरणानंतर कृषी विभागाने जिल्ह्यातील खत विक्रेत्यांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. खतांचा काळाबाजार, बनावट नोंदी अथवा शेतकऱ्यांची फसवणूक आढळल्यास संबंधित कृषी केंद्रांवर फौजदारी कारवाईसह परवाना रद्द करण्यात येईल, असा इशारा जिल्हा परवाना प्राधिकारी संतोष डाबरे यांनी दिला आहे.

खरीप हंगाम तोंडावर असताना खत विक्रीत पारदर्शकता राखण्याच्या सूचना कृषी विभागाने दिल्या आहेत. ई-पॉस यंत्रावरील साठा आणि प्रत्यक्ष गोदामातील साठ्यात तफावत आढळल्यास संबंधित विक्रेत्यांविरुद्ध तत्काळ कारवाई करण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांच्या आधार क्रमांकाचा गैरवापर करून बनावट व्यवहार केल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असेही स्पष्ट करण्यात आले. अशा गैरप्रकारांवर थेट विक्रीबंदी आणि परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाभर भरारी पथकांमार्फत धडक तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून, खत विक्री प्रक्रियेवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

### 'ई-पॉस' नोंदींची होणार पडताळणी

खत विक्रीदरम्यान ई-पॉस यंत्रातील नोंदी आणि प्रत्यक्ष साठ्याची नियमित तपासणी केली जाणार आहे. शेतकऱ्यांच्या नावावर बनावट व्यवहार अथवा आधार क्रमांकाचा गैरवापर आढळल्यास संबंधित विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले.

# जनगणना ड्युटीवरील शिक्षकांना विमा संरक्षण द्या; प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे

प्रतिनिधी २२ मे

**संग्रामपूर :** राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जनगणनेचे काम करणाऱ्या प्रगणक व पर्यवेक्षकांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून, त्यांना सुरक्षा मिळण्याची गरज आहे. संग्रामपूर तालुक्यातील दोन शिक्षकांचा जनगणना ड्युटीवर असताना नुकताच भीषण अपघात झाला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, सर्व जनगणना कर्मचाऱ्यांना किमान ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण आणि कॅशलेस उपचाराची सुविधा देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ तालुका शाखा संग्रामपूर यांच्यावतीने बुलडाणा जिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. बुलडाणा येथे कार्यालयात सादर केलेल्या निवेदनात नमूद आहे कि, सध्या देशभरात जनगणनेचे राष्ट्रीय काम सुरू असून, प्राथमिक शिक्षक प्रगणक आणि पर्यवेक्षक म्हणून आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. मात्र, दुर्गम भागात आणि सततच्या प्रवासात या कर्मचाऱ्यांना अनेक धोक्यांचा सामना करावा लागतो. नुकतेच जनगणनेचे काम बजावत असताना संग्रामपूर तालुक्यातील दोन शिक्षकांचा भीषण अपघात झाला. यात यात कचरू नारायण चव्हाण आणि सागर अरुणराव देशमुख हे दोन शिक्षक गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की, या दोन्ही शिक्षकांना अकोला येथील एका खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात दाखल करावे लागले आहे. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यातील शिक्षक व कर्मचारी वर्गात प्रचंड भीतीचे आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

अपघातात गंभीर जखमी झालेल्या संग्रामपूर तालुक्यातील या दोन्ही शिक्षकांना शासनाकडून वैद्यकीय उपचारासाठी तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी. जनगणना कामावर कार्यरत असलेल्या सर्व प्रगणक व पर्यवेक्षक कर्मचाऱ्यांना कामाच्या कालावधीसाठी किमान ५० लाख रुपयांचे अपघाती व जीविताचे विमा संरक्षण लागू करण्यात यावे. काम सुरू असताना अपघात झाल्यास किंवा आजारपण आल्यास, कर्मचाऱ्यांना त्वरित खाजगी किंवा शासकीय रुग्णालयात मोफत व कॅशलेस उपचार मिळण्याची व्यवस्था शासनाने करावी.

राष्ट्रीय कर्तव्य पार पाडताना कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी ही शासनाची आहे. जर कर्मचाऱ्यांना असे संरक्षण मिळाले, तरच ते निर्भयपणे आणि पूर्ण क्षमतेने आपले काम करू शकतील. त्यामुळे या गंभीर घटनेची नोंद घेऊन जखमी शिक्षकांना न्याय मिळवून द्यावा आणि तातडीने विमा व सुरक्षा कवच लागू करावे. निवेदन देताना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, तालुका शाखा संग्रामपूरचे अध्यक्ष श्याम कौलकार यांचेसह इतर सदस्य उपस्थित होते.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार; एक जखमी

## नांदुरा-मोताळा रस्त्यावर घडली दुर्दैवी घटना

प्रतिनिधी २२ मे

**नांदुरा :** नांदुरा-मोताळा रोडवरील अमन इंग्लिश स्कूलजवळ अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने रवींद्र रामकिसन चौहान (३३) यांचा मृत्यू झाला, तर राजवीरेंद्र रामकिसन चौहान जखमी झाले. याप्रकरणी सुरेश बाळाराम मावस्कर (रा. अमल्ला कलन, ता. खकनार, जि. बुऱ्हाणपूर, मध्य प्रदेश) यांनी २१ मे रोजी नांदुरा पोलिसांत तक्रार दाखल केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरेश बाळाराम मावस्कर व त्यांचा मित्र हे एका दुचाकीवर, तर त्यांचे चुलत साले

रवींद्र रामकिसन चौहान व राजवीरेंद्र रामकिसन चौहान दुचाकीने (क्र. एमपी १२ एमटी ८८१३) उदलसिंग गोपालसिंग राजपूत (रा. कंडारी बुद्रुक) यांच्या शेतात कामासाठी जात होते.दरम्यान, अमन इंग्लिश स्कूलजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. अपघातात रवींद्र चौहान गंभीर जखमी झाले. त्यांना नांदुरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले, तर जखमी राजवीरेंद्र चौहान यांना पुढील उपचारासाठी खामगाव येथे हलविण्यात आले.याप्रकरणी नांदुरा पोलिसांनी अप. क्र. ३२९/२०२६ अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोहेका सय्यद करीत आहेत.

# ग्रामीण भागात घरपोच गॅस सिलिंडर पुरवठा अद्यापही ठप्प

प्रतिनिधी २२ मे

**खामगाव :** आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईचा परिणाम ग्रामीण भागातील नागरिकांवर अधिक तीव्रतेने जाणवू लागला आहे. गेल्या काही दिवसांपासून घरपोच गॅस सिलिंडर वितरण व्यवस्था विस्कळीत झाली असून ग्रामीण भागात अद्यापही घरपोच पुरवठा सुरू करण्यात आलेला नाही. त्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. सुरुवातीच्या काळात गॅस टंचाईमुळे शहरातही घरपोच सिलिंडर वितरण सेवा बंद करण्यात आली होती. मात्र काही दिवसांनंतर शहरातील तसेच शहरालगतच्या काही गावांमध्ये घरपोच पुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला. तरीदेखील अनेक ग्रामीण भागांमध्ये ही सेवा अद्याप बंदच असल्याचे चित्र आहे. घरपोच सेवा बंद असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी थेट शहरात येऊन एजन्सीवरून सिलिंडर घ्यावा लागत आहे. यामुळे त्यांना वाहतूक खर्चासह वेळेचा अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दुर्गम भागातील रहिवाशांना याचा अधिक त्रास होत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, गॅस एजन्सीकडून पुरेशा प्रमाणात सिलिंडर उपलब्ध होत नसल्याने वितरण व्यवस्थेवर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. तरीही ग्रामीण भागातील घरपोच सेवा तातडीने पूर्ववत करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासन आणि संबंधित गॅस कंपन्यांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन ग्रामीण भागातील ग्राहकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पेनटाकळी ते चिखली शहर पाणीपुरवठ्याच्या मुख्य जलवाहिनीवर १५ ठिकाणी पाणी चोरी!

## खंडाळामध्ये आढळल्या ७ अवैध नळजोडण्या

प्रतिनिधी २२ मे

**चिखली :** शहराला पेनटाकळी धरणावरून होणाऱ्या पाणी पुरवठ्यातील पाणी गळती थांबवण्यासाठी नगरपालिकेकडून सुरू असलेल्या मोहिमेदरम्यान धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. धरणावरील विहिरीपासून शहरातील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत जाणाऱ्या मुख्य जलवाहिनीवर अनेक ठिकाणी अवैधरित्या पाणी चोरी होत असल्याचे समोर आले असून, खंडाळा मकरध्वज येथे तर थेट मुख्य जलवाहिनीवरून तब्बल सात अवैध नळजोडण्या आढळून आल्या आहेत.

चिखली नगरपालिकेकडून गेल्या तीन दिवसांपासून जलवाहिनीवरील गळती शोधून ती बंद करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. आमखेड, खैरव, गजरखेड फाटा आदी सुमारे आठ ठिकाणी लिकेज करून अवैधरित्या पाणी वापर सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. एका ठिकाणी तर मुख्य जलवाहिनीला थेट जोडणी करून विहिरीत पाणीसाठा केला जात होता. तर चर खोदून पाणी वळविल्याचेही दिसले. शहरातील नागरिकांना आठ ते दहा दिवसाआड पाणीपुरवठा होत असताना मुख्य जलवाहिनीवरून सुरू असलेला हा पाणी चोरीचा प्रकार किती दिवसांपासून सुरू होता, याबाबतही आता प्रश्न उपस्थित होत आहेत. या सर्व प्रकाराची नगराध्यक्ष पंडितराव देशमुख, पाणी पुरवठा सभापती दत्ता सुसर, इतर सभापती व नगरसेवकांसह मुख्याधिकारी प्रशांत बिडगर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. गळती रोखण्यास प्राधान्य दिले जातेय.

### खंडाळ्यातील अवैध नळजोडणी रडारवर

खंडाळा मकरध्वज येथे मुख्य जलवाहिनीवरील सात अवैध नळजोडण्या तोडल्यानंतर पालिकेने संबंधित अवैध नळ जोडणी असणाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शुक्रवार, दि. २२ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अमरावती परिक्षेत्रीय पोलिस विभागाची विशेष कार्यशाळा

प्रतिनिधी २२ मे

**अमरावती :** २१ मे रोजी जिल्हा पोलिस प्रशासनाच्या वतीने विद्याभारती महाविद्यालयात 'फॉरेन्सिक्स कार्यशाळा' चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश गुन्हयातील दोषसिध्दतेचे प्रमाण वाढविण्यासाठी व तंत्रशुध्दपध्दतीने तपास व्हावा यासाठी तपास अधिका-यांमध्ये वैज्ञानिक तपास पद्धतींबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच आधनिक फॉरेन्सिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढविणे हा होता. कार्यशाळेमध्ये फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीच्या विविध विभागांची सविस्तर माहिती देण्यात आली. यामध्ये डीएनए विश्लेषण, सायबर फॉरेन्सिक्स, दस्तऐवज परीक्षण, बैलिस्टिक, नार्कोटिक्स, केमिकल ॲनालिसिस ईत्यादी बाबत मार्गदर्शन करण्यात आले

कार्यशाळेत फॉरेन्सिक्सची गुन्हे तपासामधील भूमिका स्पष्ट करताना वैज्ञानिक परावे न्यायालयीन प्रक्रियेत अत्यंत



विश्वासार्ह मानले जातात याकरिता योग्य पद्धतीने परावे संकलित करून त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण केल्यास गुन्हेगारांविरुद्ध मजबूत परावे उभे राहतात व दोषसिद्धीचा दर वाढण्यास मदत होते. तसेच निष्पाप व्यक्तींना न्याय मिळवून देण्यासाठीही फॉरेन्सिक विज्ञान महत्त्वाची भूमिका याबाबत वक्त्यांनी विचार मांडले. यावेळी पोलीस दलातील अधिकारी व कर्मचा-यांना आधुनिक तपास पद्धती, तांत्रिक साधने आणि फॉरेन्सिक विज्ञानाचा अधिकाधिक वापर करून गणवत्तापूर्ण तपास करण्याचे आवाहन करण्यात आले. सदर कार्यशाळेत अमरावती परिक्षेत्रातील अमरावती ग्रामिण, वाशिम, यवतमाळ, अकोला, बुलढाणा पोलीस घटकातील २६० वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच अमंलदार त्याचप्रमाणे नव्याने कायदे लागु झाल्यानंतर सर्व पोलीस घटकातील उप-विभागीय पोलीस कार्यालयात शासनाकडुन पुरविण्यात मोबाईल फॉरेन्सीक व्हॅनवर कार्यरत सर्व अधिकारी उपस्थित होते. सदर कार्यशाळा रामनाथ पोकळे विशेष पोलिस महानिरिक्षक अमरावती यांचे अध्यक्षतेखाली अमरावती परिक्षेत्रीय स्तरावर आयोजीत करण्यात आली होती. कार्यशाळेत .डॉ विजय ठाकरे, संचालक, न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, म.रा. मुंबई, . निलेश पाटील, सहायक संचालक, न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा (सायबरफॉरेन्सीक विभाग), म.रा. मुंबई यांनी मागदर्शन केले.

# शहरातील सिटी हॉस्पिटलमध्ये एअर कंडिशनर फुटून आग, रुग्णालयात एकच गोंधळ

प्रतिनिधी २२ मे

**अकोला :** शहरातील रामदासपेठ परिसरातील सिटी हॉस्पिटलमध्ये एसी फुटून लागलेल्या आगीमुळे संपूर्ण रुग्णालयात एकच गोंधळ उडाला होता. रुग्णालयाच्या आत सर्वत्र धूरच धूर पसरला होता. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. खबरदारीचा उपाय म्हणून रुग्णालयात दाखल रुग्णांना इतर रुग्णालयात हलविण्यात आले.

शहरातील रामदासपेठ परिसरातील सिटी हॉस्पिटलमधून समोर आलेल्या या घटनेमुळे नागरिकांची चिंता वाढली आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, रुग्णालयात बसविण्यात आलेल्या एअर कंडिशनरमध्ये स्फोट झाल्यानंतर आग लागली आणि संपूर्ण




रुग्णालयात धूरच धूर पसरला होता. वरच्या मजल्यावर दाखल असलेले रुग्ण वरच अडकून पडले होते. रुग्णालयातील रुग्ण तसेच कर्मचाऱ्यांमध्ये घबराट पसरली होती. या सर्व रुग्णांना बाहेर काढण्यासाठी उपस्थित रुग्णालय कर्मचाऱ्यांना तसेच रुग्णांच्या नातेवाईकांना मोठी कसरत करावी लागली. रुग्णालयाच्या खिडक्यांच्या काचा फुटल्यामुळे येथे दाखल काही रुग्णांचे नातेवाईक किरकोळ जखमी झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. खबरदारीचा उपाय म्हणून रुग्णालयात दाखल इतर रुग्णांना निरामय हॉस्पिटल तसेच केअर हॉस्पिटलमध्ये रेफर करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभाग तसेच रामदासपेठ पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. रुग्णालयातील एअर कंडिशनर फुटल्यानंतर आग लागली होती. ती आग अग्निशमन विभागाने तात्काळ येऊन विझवली. ही आग नेमकी कशी लागली याबाबत महावितरणाचा अहवाल आल्यानंतरच माहिती मिळेल. सध्या रुग्णालयातील दाखल रुग्णांना इतर रुग्णालयात हलविण्यात आले आहे, अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

# एटीएममध्ये कार्ड अडकवून खात्यातील रक्कम गायब

प्रतिनिधी २२ मे

**अकोला :** खदान पोलिस स्टेशन हद्दीतील वाठूरकर मार्केट परिसरातील एका खासगी बँकेच्या एटीएममध्ये हा प्रकार घडला असून, एका फायनान्स व्यावसायिकाच्या खात्यातून ५० हजार रुपये लंपास करण्यात आल्याने शहरात खळबळ उडाली आहे.

एटीएम मशीनमध्ये तांत्रिक छेडछाड करून ग्राहकांचे कार्ड अडकवायचे, मदतीच्या बहाण्याने गुप्त माहिती मिळवायची आणि काही मिनिटांतच बँक खाते रिकामे करायचे, अशी भामट्यांची फसवणुकीची नवी पद्धत अकोला शहरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी प्रगती नगर येथील रहिवासी शिवदास गोविंदा सोनोने यांनी दिलेल्या तक्रारीवरून खदान पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. शिवदास सोनोने हे कौलखेड रोडवरील वातूरकर मार्केट परिसरातील एचडीएफसी बँकेच्या एटीएममध्ये मिनी स्टेटमेंट काढण्यासाठी गेले होते. त्यांनी एटीएम मशीनमध्ये कार्ड टाकताच कार्ड मशीनमध्ये अडकले आणि बाहेर आले नाही. यानंतर ग्राहकाला कार्ड बाहेर काढण्याच्या नावाखाली मशीनवर काही प्रक्रिया करण्यास सांगितले जाते. त्याचवेळी जवळपास दबा धरून बसलेले साथीदार ग्राहकाचा एटीएम पीन पाहून घेतात. ग्राहक तेथून निघून गेल्यानंतर आरोपी मशीनमधून कार्ड बाहेर काढून दुसऱ्या एटीएममधून पैसे काढतात. घाबरलेल्या सोनोने यांनी मदतीसाठी एटीएमच्या भिंतीवर लिहिलेल्या 'कस्टमर केअर' नंबरवर संपर्क साधला. फोनवरील व्यक्तीने स्वतःला बँकेचा कर्मचारी असल्याचे सांगत, 'दुपारी अधिकारी येतील आणि कार्ड परत देतील,' असे सांगून त्यांची दिशाभूल केली. विश्वास बसल्याने सोनोने घरी परतले. मात्र, काही मिनिटांतच त्यांच्या मोबाइलवर कौलखेड परिसरातील एसबीआय एटीएममधून व्यवहार झाल्याचे आणि खात्यातून ५० हजार रुपये काढण्यात आल्याचा संदेश आला. धक्कादायक म्हणजे, सोनोने यांनी संबंधित एटीएमवर धाव घेतली असता, मशीनमधून त्यांचे कार्ड गायब झाले होते. अशा प्रकारे फसवणूक करणाऱ्या गँगला पोलिसांनी धडा शिकवावा अशी मागणी आहे.

# नगर परिषदेवर महिलांचा घागर मोर्चा

प्रतिनिधी २२ मे

◆ नगरसेवक गप्प प्रशासकीय अधिकाऱ्यांवर आरोप

**शेगाव:** शहरातील पाणीटंचाईने अखेर महिलांचा संयम पूर्णपणे तुटला असून २० मे रोजी प्रभाग क्रमांक ७ आणि ८ मधील महिलांनी घागर मोर्चा काढत नगरपालिकेवर धडक दिली. संतापलेल्या महिलांनी नगरपालिका कार्यालयाच्या आवारातच प्रसिद्धी सारखी कविता वाचन करत घागरी फोडून प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यामुळे काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. पाणीसाठा उपलब्ध असतानाही शहरात पाईपलाईन दुरुस्तीच्या नावाखाली दर दोन-तीन महिन्यांनी पाणीटंचाई निर्माण होणे, हे पूर्णपणे प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभार असल्याचा घणाघाती आरोप सुज्ञ लोक करताना दिसतात अनेक दिवसांपासून नळांना पुरेशा दाबाने पाणी मिळत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत. 'घरात पाणी नाही, पण प्रशासन झोपेत आहे,' अशा शब्दांत महिलांनी संताप व्यक्त केला. प्रभागातील महिलांनी स्पष्टपणे सांगितले की, अवैध नळ कनेक्शन आणि




मोटारींमुळे पाण्याचा दाब कमी होत आहे. परंतु महिलांच्या या बोलण्याकडे नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक दुर्लक्ष करताना दिसतात 'आम्ही ५० वर्षांपासून येथे राहतो, पण आजपर्यंत अशी वाईट परिस्थिती कधी पाहिली नाही,' प्रशासक काळात हजारो अवैध कनेक्शन देण्यात आल्याचा आरोप करत त्यांनी चौकशीची मागणीही केली. पण हे सर्व आंदोलन सुरू असताना प्रशासकीय इमारतीमध्ये आंदोलन कमी आणि पब्लिसिटी स्टंट अधिक दिसून येत होता त्यामुळे हे सुद्धा म्हणावे लागेल प्रशासकीय इमारत पब्लिसिटी स्टंट साठी आहे का? असा प्रश्न आहे.

# दिवसा हीट वेव्ह रात्री वार्म नाईट

◆ सकाळचे किमान तापमान ३२ अंश सेल्सिअस

प्रतिनिधी २२ मे

**अकोला :** राज्यातील अनेक शहरांमध्ये तापमानाने ४५ अंशांचा टप्पा ओलांडला असून, विदर्भातील परिस्थिती अधिकच चिंताजनक बनली आहे. याच पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून आजपासून पुढील दोन दिवस विदर्भातील अकोला, अमरावती आणि वर्धा या तीन जिल्ह्यांना उष्णतेचा 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे. आज सकाळचे किमान तापमान हे ३१.७ अंश सेल्सिअस इतके होते.

गेल्या काही दिवसांपासून या तिन्ही जिल्ह्यांमध्ये तापमान सातत्याने ४६ अंश सेल्सिअसच्या वर नोंदवले जात आहे. आज हवामान खात्याने अकोल्याचे तापमान ४७ अंश सेल्सिअस होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. सकाळ अकोल्याचे तापमान सरासरीपेक्षा अडीच अंश जास्त होते. ते ३०.७ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. विदर्भात सध्या हवामानाचा एक भलताच आणि अत्यंत घातक ट्रेंड पाहायला मिळत आहे. विदर्भवासीयांना सध्या दिवसा उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागत आहेच, पण आता रात्रीचीही झोप उडणार आहे. कारण विदर्भाला आता दिवसा 'हीट वेव्ह' आणि रात्री 'वार्म नाईट'चा असा डबल अटॅक सहन करावा लागणार आहे. सिमेंटचे रस्ते, उंच इमारती, टिनशेडची घरे आणि डांबरी रस्ते दिवसभर उष्णता शोषून घेतात आणि रात्रीही ती वातावरणात सोडतात.

# मंदिरांचे उत्पन्न हिरावून घेणारा 'काळा कायदा' मागे घ्या ; मंदिर महासंघाची शासनाकडे मागणी

प्रतिनिधी २२ मे

**अकोला :** राज्य सरकारच्या महसूल व वन विभागाने प्रस्तावित केलेल्या 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' या अत्यंत वादग्रस्त मसुद्यामुळे राज्यातील हजारो हिंदू देवस्थानांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. हा कायदा म्हणजे मंदिरांच्या जमिनी हडपण्याचा 'सरकारी कट' असून, यामुळे हिंदूंच्या धार्मिक आणि मालमत्ताविषयक हक्कांवर थेट घाला घातला जात आहे. या अन्यायी कायद्याचा तीव्र निषेध करत महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने अकोला आणि मूर्तिजापूर येथे जिल्हाधिकारी व



तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले. महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी या मसुद्यातील गंभीर त्रुटींकडे लक्ष वेधले आहे. हा प्रस्तावित कायदा वक्फ अधिनियमाच्या कक्षेतील जमिनींना वगळून, केवळ हिंदू मंदिरांच्या जमिनींना लक्ष्य करत आहे. यामुळे देवस्थानांच्या जमिनी वहिवाटदार, पुजारी किंवा अतिक्रमणधारकांच्या (भोगवटदार वर्ग-१) नावे करून मंदिरांचे उत्पन्नाचे मुख्य स्रोत कायमचे नष्ट केले जाणार आहेत. जमिनींचे हस्तांतरण, न्यायालयीन अधिकारांवर गदा, धोरणात्मक दुजाभाव होईल. अकोला येथे जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना निवेदन देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र मंदिर महासंघाचे जिल्हा संयोजक प्रमोद अग्निहोत्री, प्रशांत देशमुख, उदय महा, प्रा. राजीव इंगळे, धनंजय मेहसरे, प्रशांत लांडे, विनायक गावंडे, ॲड. रश्मी यादव, ॲड. श्रुती भट आणि श्रीकांत पिसोळकर उपस्थित होते. मूर्तिजापूरला तहसीलदारांना दिलेल्या निवेदनावेळी दिनकर ठाकरे, मनोज अग्रवाल, कमलाकर माणिकपुरे, उज्ज्वल देशमुख, मनीष जमादार, निशांत जमादार, डॉ. अर्पण दुबे, विनोद पारसकर, राहुल तिडके, आतिश महाजन, रवी राठी, पवन आजळकर, संतोष पाठक, अनूप यदुवर, विष्णू चवडे, तायडे आणि खोकले उपस्थित होते.

# शिर्ला ग्रामपंचायतीत दीड कोटींचा भ्रष्टाचार? नागरिकांचा संताप; सखोल चौकशीची मागणी

प्रतिनिधी २२ मे

**पातूर :** शिर्ला ग्रामपंचायत हद्दीत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला असून संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. सन २०२३ आणि २०२४ या कालावधीत तत्कालीन ग्रामसेवक, सचिव व सरपंच यांच्या कार्यकाळात १५ वा वित्त आयोग, सामान्य निधी, दलित वस्ती सुधार योजना आणि वृक्षलागवड योजनेअंतर्गत तब्बल दीड कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे या खर्चाचा ऑनलाईन रेकॉर्ड किंवा अधिकृत नोंदी ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध नसल्याने संशय अधिकच गडद झाला आहे. 'कामे झाली कुठे आणि पैसा गेला कुठे?' असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. शिरला ग्रामपंचायत अंतर्गत शिरला गावासह पातूर बागायत, पातूर पट्टी आणि अमराई ही महसुली गावे येतात.

मात्र मूळ शिरला गाव वगळता उर्वरित तीन गावांमध्ये सार्वजनिक विद्युत व्यवस्थाच नसल्याचे वास्तव समोर आले आहे. तरीसुद्धा ग्रामपंचायतीने सार्वजनिक लाईट दुरुस्ती व देखभालीसाठी तब्बल १ लाख १२ हजार रुपये खर्च दाखविल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. गावात अवघे ४० ते ५० सार्वजनिक विद्युत खांब असताना एवढा खर्च नेमका कशावर करण्यात आला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्याचबरोबर महिलांना प्रशिक्षण देण्याच्या नावाखाली १ लाख ७६ हजार रुपयांचा खर्च दाखविण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात कोणतेही प्रशिक्षण, जनजागृती कार्यक्रम किंवा महिला सक्षमीकरण उपक्रम झाले नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कागदोपत्री प्रशिक्षण दाखवून निधीची अफरातफर केल्याची चर्चा गावात रंगली आहे. दरम्यान, ग्रामपंचायतीतील विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप करत नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

'भ्रष्टाचार करणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे,' अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. आता प्रशासन या गंभीर आरोपांची दखल घेऊन चौकशी करणार का, की हा भ्रष्टाचार फाईलपुरताच मर्यादित राहणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# डिझेल टंचाई अन् दरवाढीचा खाजगी ट्रॅव्हल्सला 'शॉक'!

लक्झरी बसेस उभ्या राहिल्या; प्रवाशांचा प्रवास महागला

प्रतिनिधी २२ मे

**अकोला :** आधीच विविध करांच्या आणि आर्थिक मंदीच्या बोजाखाली दबलेला खाजगी लक्झरी बस उद्योग आता पूर्णपणे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. बाजारात निर्माण झालेली डिझेलची तीव्र टंचाई आणि कडाडलेले भाव यामुळे खाजगी बस वाहतूक क्षेत्रावर संकटाचे मोठे वादळ घोंगावू लागले आहे. इंधनाचा खर्च परवडत नसल्याने ट्रॅव्हल्स मालकांवर आपल्या कोट्यवधी रुपयांच्या लक्झरी बसेस जागेवरच उभ्या करण्याची वेळ आली आहे. या भीषण परिस्थितीमुळे या उद्योगावर अवलंबून असलेले हजारो वाहन चालक आणि क्लिनर थेट बेरोजगार होणार का? असा यक्षप्रश्न निर्माण झाला आहे. डिझेलच्या किमती गगनाला भिडल्यामुळे खाजगी ट्रॅव्हल्स चालकांनी तिकिटांच्या दरात प्रचंड वाढ केली आहे. अकोल्यातून मुंबई, पुणे, नागपूर किंवा इंदूर जाणाऱ्या प्रवाशांना आता प्रवासासाठी अव्वाच्या सव्वा आणि अतिरिक्त पैसे मोजावे लागत आहेत. 'डिझेल मिळत नाही आणि जे मिळतेय ते महाग आहे, मग आम्ही जुन्या दरात गाड्या कशा चालवणार?' असा सूर ट्रॅव्हल्स मालकांमधून निघत आहे. मात्र, या चढाओढीत सामान्य प्रवाशांचा खिसा मात्र रिकामा होत आहे. खाजगी ट्रॅव्हल्सचे तिकीट बजेटच्या बाहेर गेल्यामुळे अकोल्यातील बहुतांश प्रवाशांनी आता लक्झरी बसेसकडे पाठ फिरवली आहे. परिणामी, राज्य परिवहन महामंडळाच्या आणि रेल्वे गाड्यांकडे प्रवाशांची प्रचंड गर्दी उसळू लागली आहे. एसटी स्थानक आणि रेल्वे स्थानकांवर प्रवाशांचे पाय ठेवायला जागा उरलेली नाही. सरकारी वाहतूक व्यवस्था स्वस्त वाटत असल्याने खाजगी ट्रॅव्हल्सचे बुकिंग कमालीचे घटले असून, गाड्या रिकाम्या धावण्याची भीती निर्माण झाली आहे.

# पूर्णा नदीपात्रात बुडून तरूणाचा मृत्यू


प्रतिनिधी २२ मे

**नांदुरा :** पूर्णा नदीपात्रातील पाण्यात बुडून तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना २१ मे रोजी पातोंडा शिवारातील पूर्णा नदी पात्रात घडली. याबाबत ऋषीकेश संतोष तायडे वय २९ वर्ष, रा. अलमपूर यांनी नांदुरा पोलीस स्टेशनला फिर्याद दिली की, त्यांचा चुलतभाऊ नामे तुषार रामदास तायडे वय २३ वर्ष रा. अलमपूर हा कोठारी कॉलेज नांदुरा येथे शिपाई म्हणून नोकरी करत होता. त्याचा पातोंडा शिवारातील उमेश कुवारे यांचे शेतात गोठा असून तेथेच गावातील उमेश कुवारे यांचा बकऱ्यांचा गोठा आहे. त्यामुळे चुलतभाऊ तुषार याच्या गाई उमेश कुवारे हा त्याचे बकऱ्यांसोबत चारत असतो. तुषार हा दररोज त्याचे गाईला पाणी पाजण्यासाठी गोठ्यावर जात होता. दरम्यान गुरूवारी तुषार याची गाय पूर्णा नदी पात्राकडे जात असतांना तिला हाकलण्यासाठी तुषार हा पूर्णा नदीचे काठावर गेला असता त्याचा पाय घसरुन तो पाण्यात बुडून मरण पावला.

# अरुणावती प्रकल्पातील राखीव पाणी तातडीने सोडा – आ.प्रा. राजू तोडसाम

प्रतिनिधी २२ मे

**आर्णी :** उन्हाच्या तीव्र झळांमुळे आर्णी व घाटंजी तालुक्यातील पाणीटंचाई अधिकच गंभीर बनली असून, अरुणावती प्रकल्पातील राखीव पाणी लाभक्षेत्रातील गावांसाठी तातडीने सोडण्यात यावे, अशी मागणी आमदार राजू तोडसाम यांनी केली आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना २१ मे रोजी पत्र पाठविले. सध्या जिल्ह्यात तापमानाचा पारा ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत असून, ग्रामीण भागातील नदी-नाले, विहिरी, बोअरवेल आणि हातपंप कोरडे पडले आहेत. परिणामी नागरिकांसह शेतकरी वर्गास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक शेतकऱ्यांनी



उन्हाळी पिके घेतली असून ऊस, फळबाग आणि भाजीपाला उत्पादकांना पाण्याअभावी मोठे नुकसान सहन करावे लागत असल्याचे तोडसाम यांनी पत्रात नमूद केले आहे. याशिवाय शेतातील आणि जंगल परिसरातील पाणवठे आटल्याने पाळीव जनावरे तसेच वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे अरुणावती प्रकल्पातील उपलब्ध राखीव पाणीसाठा लाभक्षेत्रातील गावांसाठी सोडून शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, प्रकल्पाचे पाणी उपलब्ध झाल्यास परिसरातील वाढती पाणीटंचाई काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK